रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ११६
www.ramprahar.com
मंगळवार, १२ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

नोव्हेंबर महिन्यातसुद्धा गुलाबी थंडीची प्रतीक्षा/२
रायगडात दिव्यांग, ज्येष्ठांचे होणार गृहमतदान/५
रोहित शर्मा पर्थ कसोटीला मुकणार?/८

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज पेणमध्ये सभा



**पेण** : महायुतीचे पेण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार, माजी मंत्री तथा विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी (दि. १२) पेणमध्ये सभा घेणार आहेत. या सभेला राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही सभा नगरपालिका मैदानावर दुपारी २ वाजता सुरू होणार असून या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय बोलणार याकडे पेणकरांचे लक्ष लागून राहिले आहे. महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांनी प्रचारात आघाडी घेतली असून उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेने मतांच्या संख्येत आणखी वाढ होईल, अशी महायुतीला आशा आहे.

# राहुल गांधींच्या अनेक पिढ्या आल्या तरी संविधान बदलू शकणार नाहीत!

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा कामोठ्यातील सभेतून हल्लाबोल

**पनवेल : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या अनेक पिढ्या आल्या तरी संविधान बदलू शकणार नाहीत, असा हल्लाबोल केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी रविवारी (दि. १०) कामोठे येथे केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री आठवले यांची जाहीर सभा झाली. त्या वेळी ते बोलत होते.






कामोठे सेक्टर ११मधील सुषमा पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे झालेल्या या सभेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रभाकर कांबळे, तालुका अध्यक्ष विजय पवार, कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, डॉ. विजय मोरे, दलित पँथरचे बाळासाहेब पडवळ, भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, चारुशीला घरत, राजश्री वावेकर, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

### जय भीमचा बुलंद आवाज प्रशांतजींच्या पाठिशी!

या वेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आपल्या शैलीत कविता करताना, ‘आमदार प्रशांत ठाकूर करीत नाही काम खोटे, म्हणून त्यांना निवडून देणार आहे कामोठे’; ‘मला अनेक वेळा वाटते, चौथ्यांदा प्रशांतजींना निवडून देणार आहे पनवेल आणि कामोठे’, असे सांगून या निवडणुकीत आम्ही सर्वजण मैदानात उतरलेलो आहोत. रिपब्लिकन पक्ष महायुतीच्या मागे आहे. जय भीमचा बुलंद आवाज प्रशांतजींच्या पाठिशी उभा आहे, असे आवर्जून सांगितले.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला स्वाभिमान शिकवला, देश कसा पुढे घेऊन जायचा हे शिकवले. समाजापेक्षा देश मोठा असल्याचे सांगितले. देशावर जेव्हा वेळ येईल तेव्हा जात, धर्म बाजूला ठेवा असे शिकवले. आमचा प्राण गेला तरी चालेल, पण आम्ही देशासाठी लढणारे लोक आहोत. आज बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान कोणीही बदलू शकणार नाही. राहुल गांधी खोटा प्रचार करतात, म्हणून त्यांचा निवडणुकीत तोटा होतो. खरे बोलणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी संविधानाला माथा टेकून शपथ घेतात. त्यामुळे ते संविधान बदलणे शक्य नाही. त्यांच्या सभेत ते अर्धे भाषण संविधानावर करतात. बाबासाहेबांबद्दल प्रचंड आदर ठेवणारी त्यांची भूमिका आहे, असे केंद्रीय मंत्री आठवले यांनी सांगितले.

ओबीसी समाजातील पंतप्रधान असलेल्या नरेंद्र मोदी यांना खाली खेचण्यासाठी सगळे एकत्र आले आहेत, पण हा पठ्ठ्या त्यांच्या पाठीशी उभा राहणार आहे. माझा समाज हा भोळाभाळा आहे, पण शिकलेला आहे. कोणाला निवडून द्यायचे व कोणाला पडायचे त्यांना चांगले माहिती आहे. या ठिकाणी शेकापचा उमेदवार पडणार असून आमदार प्रशांत निवडून येण्याचा इतिहास पुन्हा घडणार असल्याचे ना. आठवले यांनी नमूद केले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे रामशेठ ठाकूर यांच्यासोबत असलेल्या मैत्रीच्या नात्यामुळे त्यांनी मला सातत्याने आशीर्वाद दिला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आमदारकीला २००९मध्ये उभा राहिल्यापासून त्यांनी प्रत्येक वेळी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप मारून केलेल्या कार्याचे कौतुक केले आहे. त्यांचासारखा नेता पाठीशी असणे ही माझ्यासाठी कौतुकाची, गौरवाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. (पान २ वर..)

## शेकापविरोधात ‘उबाठा’ची निवडणूक आयोगाकडे तक्रार

### ‘मविआ’ नेत्यांच्या फोटोला आक्षेप

### अपप्रचाराबाबत कारवाईची मागणी




**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात शेकाप उमेदवार महाविकास आघाडीच्या नेत्यांचे फोटो वापरून प्रचार करत आहेत. अशाच प्रकारे उरणमध्ये शेकाप उमेदवाराकडून होणाऱ्या अपप्रचाराबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निवडणूक अधिकाऱ्यांकडे आक्षेप नोंदवला आहे.

रायगड जिल्ह्यात पनवेल, पेण आणि उरण या तीन विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. त्यामुळे शेकाप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात निवडणूक रिंगणात आहेत. दोन्ही पक्षांच्या उमेदवारांकडून प्रचारात महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या फोटोंचा वापर केला जात आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उरणमधून माजी आमदार मनोहर भोईर, पनवेलमधून लीना गरड आणि पेणमधून प्रसाद भोईर निवडणूक लढवत आहेत; तर शेकापने उरणमधून प्रितम म्हात्रे, पेणमधून अतुल म्हात्रे आणि पनवेलमधून बाळाराम पाटील यांना उमेदवारी दिली आहे. दोन्ही पक्षांचे उमेदवार आपण महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचा दावा करीत आहेत. त्यामुळे मतदारही चक्रावले आहेत.

उरणमध्ये शेकापचे प्रितम म्हात्रे यांच्याकडून प्रचारात महाविकास आघाडीच्या पक्षांच्या नेत्यांचे फोटो प्रचारात वापरले जात आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे सांगत ‘उबाठा’कडून निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आचारसंहितेच्या परिशिष्ट १ भाग ७मधील आदेश क्रमांक (५) मधील तरतुदीनुसार मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केल्याप्रकरणी शेकाप उमेदवार प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत, असे पत्र शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सचिन पारसनाईक यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले आहे. पनवेल आणि पेणमध्येही महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कोण याबाबत अशीच गोंधळाची परिस्थिती आहे. त्यामुळे या आघाडीकडून अधिकृत उमेदवार कोण हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

## निवडक

### मणिपूरमध्ये पोलीस ठाण्यावर हल्ला करणारे ११ अतिरेकी ठार

**इम्फाळ** : मणिपूरच्या जिरीबाममध्ये झालेल्या चकमकीत सीआरपीएफने ११ अतिरेक्यांचा खात्मा केला आहे. या चकमकीत सीआरपीएफचे दोन जवान जखमी झाल्याचेही वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संशयित कुकी अतिरेक्यांनी जिरीबाम जिल्ह्यातील बोरोबेकरा पोलीस ठाण्यावर सोमवारी (दि. ११) दुपारी अडीच वाजता हल्ला केला. अतिरेक्यांच्या बाजूने सीआरपीएफच्या पथकावर मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. त्यानंतर सीआरपीएफच्या जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. या चकमकीत आतापर्यंत ११ अतिरेकी ठार झाले आहेत.

### संजीव खन्ना यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ

**नवी दिल्ली** : न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी



सोमवारी (दि. ११) देशाचे ५१वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संजीव खन्ना यांना सरन्यायाधीशपद आणि गोपनीयतेची शपथ दिली. खन्ना १३ मे २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत. त्यांना सरन्यायाधीश पदावर कार्यरत राहण्यासाठी फक्त सहा महिन्यांचा अवधी मिळणार आहे.

## महाविकास आघाडीने आमचा वचननामा चोरला

### मुख्यमंत्र्यांची टीका



**वैजापूर : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीने आमचा वचननामा चोरून त्यांचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे. कॉपी पेस्ट करून जाहीरनामा बनवता येत नाही, हे त्यांना माहिती नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते छत्रपती संभाजीनगरमधील वैजापूर येथे महायुतीचे उमेदवार रमेश बोरनारे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.

महाविकास आघाडीने अडीच वर्षात काय केले आणि आम्ही काय केले याची खुली चर्चा करायला मी तयार आहे, मात्र विरोधक हे आव्हान स्वीकारायला नाही, कारण त्यांनी अडीच वर्षांत काहीही केले नाही, असे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महाविकास आघाडीच्या सरकारने अडीच वर्षांत अनेक विकास प्रकल्पांना स्थगिती दिली. राज्यात अडीच वर्ष स्थगिती सरकार होते. त्या वेळी मंदिरे, इतर प्रार्थनास्थळेही बंद केली होती. त्यानंतर महायुतीचे सरकार आले आणि आपण राज्यातील सगळी मंदिरे उघडली तसेच स्थगिती मिळालेल्या सगळ्या योजना पुन्हा सुरू केल्या.

महायुतीचा जाहीरनामा म्हणजे फक्त ट्रेलर आहे. संपूर्ण सिनेमा अजून यायचा बाकी आहे. आम्ही लाडकी बहीण योजनेत महिलांना १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही शेतकरी सन्मान योजनेचा निधीदेखील वाढवला आहे. प्रत्येकाच्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी पुढे बोलताना सांगितले.

## विजयाचा गुलाल आपलाच असेल -आमदार महेश बालदी

### मोहोपाड्यातील सभेत अनेकांचा भाजपमध्ये प्रवेश




**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

२०१९मध्ये याच व्यासपीठावर मी शिव-समर्थांचा आशीर्वाद घेतला आणि विजयी झालो. त्याबद्दल तुम्हा सर्वांचे सर्वप्रथम आभार मानतो. त्या वेळी अपक्ष म्हणून निवडून आलो. आता तर पक्षासह तुमची साथ मला आहे. यामुळे विजयाचा गुलाल आपलाच असेल, असा विश्वास महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांनी मोहोपाडा येथील सभेत व्यक्त केला.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि. १०) भव्य सभा झाली. त्या वेळी ते बोलत होते. या सभेला भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, राष्ट्रवादीचे नेते संदीप मुंढे, सुरेश पाटील, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष व सरपंच उमा मुंढे, चौकच्या सरपंच रितू ठोंबरे, सावळे सरपंच सुनील माळी, आरपीआयचे महेंद्र धनगावकर, भाजप कामगार सेलचे अनंत पाटील, माजी सरपंच किरण माळी, विजय मुरकुटे, ताई पवार, विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, डॉ. अविनाश गाताडे, चौक अध्यक्ष गणेश कदम, सागर ओसवाल, माजी अध्यक्ष रामदास ठोंबरे, भूषण पारंगे यांच्यासह पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार महेश बालदी पुढे म्हणाले की, या विभागात कोट्यवधी रुपयांची विकासकामे पाच वर्षात केली. पुढील पाच वर्षात याहून अधिक कामे आणणार आहे. सध्या निवडणूक प्रचारात चालू आहे की आमदार जातीचा आहे का, पण जनता सुज्ञ आहे. २१व्या शतकात कोण जात-पात बघत नाही, तर विकासाला महत्त्व देतात. त्यामुळे विकासकामे पाहूनच जनताजनार्दन मतदान करेल.

माझ्या आधीच्या आमदारांनी सत्तेत असताना विकासकामे केली नाही, ती कामे मी करून दाखवली. कोन-सावळा रस्त्यासाठी शेकापने फक्त आंदोलन केले, परंतु हे रस्त्याचे काम करण्यात मी यशस्वी झालो. मोहोपाडा येथे सिमेंट काँक्रीटीकरण केले. वासांबे विभागातील नागरिकांसाठी नाना नानी पार्क, तलावांचे सुशोभीकरण, रस्ते आदी कामे करणार आहे. मतदारसंघात एकाही आदिवासी बांधवाचे घर कुडाचे राहणार नाही, असेही आमदार बालदी यांनी सांगितले.

या वेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले.

## दिव्यांग बांधवही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठिशी

### दिव्यांग क्रांती संघटना व दिव्यांग उत्कर्ष सामाजिक संस्थेचा पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभा निवडणुकीसाठी दिवसेंदिवस विविध संस्था, संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. आता दिव्यांग क्रांती संघटना व दिव्यांग उत्कर्ष सामाजिक संस्थेनेही आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

या संदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे पाठिंबापत्र सुपूर्द करण्यात आले असून यात म्हटले आहे की, आमच्या संघटनेच्या झालेल्या सर्वसाधारण बैठकीत संस्थापक अध्यक्ष बी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनात सर्व पदाधिकारी व सदस्यांनी भाजप महायुतीचे उमेदवार व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना बिनशर्त व सक्रिय पाठिंबा जाहीर केलेला आहे.



आमचा प्रत्येक दिव्यांग सदस्य, त्यांचे कुटुंबीय, निराधार तसेच इतर सर्व सदस्य, पदाधिकारी आपल्या पाठिशी ठामपणे उभे आहेत.

आदरणीय रामशेठ ठाकूर हे दानशूर व उदार तसेच समाजातील गोरगरीब व दिव्यांग; त्याचबरोबर विद्यार्थी, गुणवंत, गरजवंत अशा सर्वांना मदतीचा हात नेहमीच पुढे करणारे लोकनेते आहेत आणि त्यांचा सामाजिक बांधिलकीचा वारसा त्यांचे सुपुत्र आमदार प्रशांत ठाकूर चालवत आहेत. त्यांनी जनहिताची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आमदारपदावर यशस्वी गरूडझेप घेऊन पनवेल मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी व जनहिताची कामे करण्यात मग्न राहणारा आमदार त्यांच्या रूपाने लाभला हे या मतदारसंघाचे सुदैव आहे.

दांडगा जनसंपर्क व सर्वसामान्य जनतेविषयीची सहानुभूती यामुळे २०२४च्या विधानसभा निवडणुकीतसुद्धा आपण फार मोठ्या मताधिक्याने विजयी होणार याविषयी आम्हा सर्वांना खात्री आहे. नेतृत्वगुण व समाजसेवी व्यक्ती म्हणून या मतदारसंघातील सुजाण जनता आपणास बहुसंख्येने विजयी करणार हे निश्चित असून आमच्या दिव्यांग क्रांती संघटना व दिव्यांग उत्कर्ष सामाजिक संस्थेतर्फे पाठिंबा देत आहोत, असेही या पाठिंबापत्रात नमूद करण्यात आले आहे.

## रोहित शर्माच्या पत्नीनेही खरेदी केली अलिबागमध्ये जमीन

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा याची पत्नी रितिका प्रदीप सचदेह हिने अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी येथे १५ गुंठे आणि सारळ येथे ७१.९० गुंठे जागा विकत घेतली आहे. रोहितने सोमवारी (दि. ११) पत्नीसह अलिबाग दुय्यम निबंधक कार्यालयात येऊन जमिनीची दस्त नोंदणी पूर्ण केली.

अलिबाग तालुक्यात उद्योजक, राजकारणी, क्रिकेटपटू, अभिनेते, साहित्यिकांनी जागा घेऊन बंगले बांधले आहेत. रोहितने आधीच म्हात्रोळी येथे साडेचार एकर जमीन घेतली आहे.

## रायगड पोलिसांनी घेतली तीन हजार दंगेखोरांची हजेरी

### पुढील कारवाईसाठी अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी रायगड पोलिसांनी नियोजन केले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांची यादी तयार केली करून कलम १२६, १२८, १२९, १६८, ९३,५५, ५६, ५७, एमपीडीए कायद्यांतर्गत तीन हजार १३५ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणूक दहा दिवसांवर आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यापासून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई, अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध कारवाईचा धडाका सुरू केला आहे. निवडणूक काळात ज्यांच्यामुळे गोंधळ होण्याची शक्यता आहे, अशा तीन हजार १३५ जणांविरुद्ध तात्पुरत्या स्वरूपातील कारवाईचे प्रस्ताव पोलिसांनी तयार केले आहे. हा प्रस्ताव संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहेत. लवकरच जिल्हा प्रशासनाकडून यावर निर्णय घेणार आहे.

दरम्यान, आचारसंहिता लागू झाल्यापासून पोलीस अधिकाऱ्यांनी एक हजार ५३ गावांना भेटी दिल्या. मंडळाचे पदाधिकारी व शांतता किंवा मोहल्ला कमिटीच्या २७६ बैठका घेतल्या आहेत. निवडणूक काळात कुठलाही वादाचा प्रसंग उद्भवणार नाही, धार्मिक मुद्दे उपस्थित केले जाणार नाहीत याची दक्षता घेण्याचे आवाहन पोलिसांनी या बैठकांच्या माध्यमातून ग्रामस्थांना केले आहे.

**निवडणूक काळात कायदा, सुव्यवस्था अबाधित राखली जाईल याची सर्वतोपरी काळजी घेतली जात आहे. दंगेखोरांना नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून लेखी करारपत्र घेत समज दिली आहे.**
**-सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस अधीक्षक**

# कोल्हापूरमध्ये सर्वाधिक जप्तीची कारवाई

## १० मतदारसंघात आतापर्यंत १० कोटी ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर राज्यात चांदा ते बांदा अवैध मुद्देमाल जप्त करण्याचा धडाकाच सुरुच असून कोल्हापूर जिल्ह्यातही मोठी कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत स्थिर सर्वेक्षण पथक राज्य पोलीस दल, राज्य उत्पादन शुल्क विभाग, राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून या कारवाईमध्ये आतापर्यंत १० कोटी ७१ लाखांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील १० मतदारसंघांपैकी सर्वाधिक दारु जप्तीची कारवाई कोल्हापूर दक्षिण, करवीर, राधानगरी आणि चंदगड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक दारु जप्त करण्यात आली आहे.



चंदगड विधानसभा मतदारसंघात रोख रक्कम २ लाख, अवैध मद्य २७ लाख ८ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल दोन लाख ३२ हजार असे एकूण ३१ लाख ४० हजार; राधानगरी विधानसभा मतदारसंघ अवैध मद्य १६ लाख ४१ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल ४२ हजार याप्रमाणे एकूण १६ लाख ८३ हजार; कागल विधानसभा मतदारसंघ रोख रक्कम ३६ हजार, अवैध मद्य सहा लाख ९९ हजार रुपये, सोने, चांदी १० लाख ९३ हजार, इतर अवैध मुद्देमाल २६ लाख १९ हजार याप्रमाणे एकूण ४४ लाख ४७ हजार; कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ रोख रक्कम सहा लाख ९४ हजार, अवैध मद्य ३९ लाख ७७ हजार रुपये, अंमली पदार्थ ९० हजार, इतर अवैध मुद्देमाल १२ लाख ८१ हजार याप्रमाणे एकूण ६० लाख ४३ हजार; करवीर विधानसभा मतदारसंघ अवैध मद्य १८ लाख ५१ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल १९ लाख ९७ हजार याप्रमाणे एकूण ३८ लाख ४८ हजार; कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघ रोख रक्कम १५ लाख ६२ हजार, अवैध मद्य पाच लाख ५५ हजार रुपये, सोने, चांदी पाच कोटी ५८ लाख ७२ हजार, इतर अवैध मुद्देमाल सहा लाख ९८ हजार याप्रमाणे एकूण पाच कोटी ८६ लाख ८७ हजार; शाहूवाडी विधानसभा मतदारसंघ अवैध मद्य तीन लाख ८६ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल नऊ लाख ७२ हजार याप्रमाणे एकूण १३ लाख ५८ हजार; हातकणंगले विधानसभा मतदारसंघ रोख रक्कम एक लाख ३४ हजार, अवैध मद्य १७ लाख ६७ हजार रुपये, सोने, चांदी दोन कोटी तीन लाख ७७ हजार, इतर अवैध मुद्देमाल १४ लाख ६१ हजार याप्रमाणे एकूण दोन कोटी ३७ लाख ३९ हजार; इचलकरंजी विधानसभा मतदारसंघअवैध मद्य तीन लाख ६२ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल सहा लाख ९३ हजार याप्रमाणे एकूण १० लाख ५५ हजार; शिरोळ विधानसभा मतदारसंघ अवैध मद्य ११ लाख १६ हजार रुपये, इतर अवैध मुद्देमाल १९ लाख ८८ हजार याप्रमाणे एकूण ३१ लाख तीन हजार असा एकूण रोख रक्कम २६ लाख २५ हजार, अवैध मद्य एक कोटी ५० लाख ६२ हजार, अमली पदार्थ ९० हजार, सोने, चांदी इ. सात कोटी ७३ लाख ४२ हजार, इतर अवैध मुद्देमाल एक कोटी १९ लाख ८३ हजार असा एकूण १० कोटी ७१ लाख ३ हजार किंमतीचा मुद्देमाल विविध पथकांनी धडक कारवाईमध्ये जप्त केला आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# निवडणूक निरीक्षकांनी घेतला पनवेल महापालिकेच्या स्वीप कार्यक्रमाचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रिय निवडणूक निरीक्षक धुनीचंद राणा यांनी महापालिकेच्या वतीने करीत असलेल्या स्वीप कार्यक्रमांर्गत मतदान जनजागृती कार्यक्रमाचा आढावा पालिका मुख्यालयात घेतला.



या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, स्वीप कार्यक्रम प्रमुख शहर अभियंता संजय कटेकर, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, विस्तार अधिकारी, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सिडको अधिकारी, महापालिका अधिकारी उपस्थित होते.

पनवेल विधानसभा मतदार केंद्रामधील ज्या ठिकाणी मतदार केंद्रामध्ये मतदानाची टक्केवारी कमी आहे, अशा मतदान केंद्रामध्ये मतदान वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत निवडणूक निरीक्षकांनी सूचना दिल्या, तसेच सोसायटचामधील मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रयत्न करण्याबाबत सूचना दिल्या.

महापालिकेच्या वतीने स्वीप कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. महापालिकेने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रमांतर्गत प्रभात फेरी, बाईक रॅली, फ्लॅश मॉब, वासुदेव, मास्कॉट्स, सेल्फी पॉईंट्स, बचत गटाच्या महिलांची बैठक, रॅली, आशासेविकांच्या माध्यमातून मतदान कमी असणाऱ्या भागात पत्रकाचे वाटप करण्यात येत आहे, तसेच वासुदेवांच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात येत आहे.

गॅस एजन्सीच्या माध्यमातून सिलेंडरवर मतदान जनजागृतीचे स्टीकर्स लावण्यात येत आहेत. याचबरोबर घंटागाडीवर मतदान जनजागृतीपर जिंगल्स वाजविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या सायकल रॅली, जनजागृती गाडीवर आयुक्त मंगेश चितळे यांचे मतदान करण्यासाठी आवाहन करणारे व्हिडीओ चौकाचौकामध्ये प्रदर्शित केले जात आहे. याबरोबरच फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम अशा समाजमाध्यमांवर जनजागृती करण्यात येत आहेत.

# आमदार रविशेठ पाटील यांना पेण शहरातून मताधिक्य देणार

## माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी व्यक्त केला विश्वास

**पेण : प्रतिनिधी**


पेण मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांना शहरातून २० हजार मताधिक्य देऊन विजयी करणार असल्याचा विश्वास माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी सोमवारी (दि.११) रोहिदास नगर फणासदोंगरी येथे व्यक्त केला.

पेण शहराच्या विकासासाठी रविशेठ पाटील यांनी कोट्यावधींचा निधी आणला. यामुळेच त्यांना जास्तीत जास्त मतदान करून निवडून आणू, या असे आवाहन त्यांनी केले. या प्रचाराला माजी उपनगराध्यक्ष दीपक गुरव, माजी नगरसेविका प्रतिभा जाधव, शेनाज मुजावर, नलिनी पवार, माजी नगरसेवक अजय शिरसगर, कार्यकर्ते उपस्थित होते.



### माजी मंत्र्यांच्या नाती प्रचार दौऱ्यात अग्रेसर

माजी मंत्री स्व. मोहन पाटील आणि आमदार रविशेठ पाटील या दोघांच्या नाती सई पाटील आणि हर्षा पाटील या दोघींनी प्रचारदौऱ्यात आघाडी घेतली आहे. माजी मंत्री स्व. मोहन पाटील आणि रविशेठ पाटील हे परस्परांचे राजकीय प्रतिस्पर्धी होते, परंतु २०१९च्या निवडणुकीमध्ये रविशेठ पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर २०२३मध्ये धैर्यशील पाटील यांनीदेखील भाजपचे कमळ हाती घेतले. त्यामुळे राजकीय विरोधक असलेले वरवठण्याचे पाटील व राव्याचे पाटील एक झाले.




## ‘आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी सर्वतोपरी प्रयत्न’

**पनवेल** : विधानसभा मतदारसंघात चौथ्यांदा उभे असलेले असलेले प्रशांत ठाकूर यांच्यासाठी आता पनवेलमधील शिवसेनादेखील सर्व शक्तीनिशी पुढे सरसावली आहे. शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांनी नुकतेच पत्रकार परिषद घेऊन प्रशांत ठाकूर यांना निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या पत्रकार परिषदेला संबोधित करताना त्यांनी आपण युतीधर्म तंतोतंत पाळल्याचा पुनरुच्चार केला, तसेच आमदार प्रशांत ठाकूर हे चौथ्यांदा १०० टक्के निवडून येणार असा विश्वास बोलून दाखवला.

# पनवेल मतदारसंघात १३७ मतदारांनी बजावला गृहमतदानाचा हक्क





**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी घरबसल्या मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात १३७ मतदारांनी सोमवारी (दि.११) गृहमतदानाचा हक्क बजावला, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांनी दिली.

मतदारसंघातील रहिवासी ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या १२४ ज्येष्ठ नागरिकांनी, १३ दिव्यांग मतदार यांनी घरबसल्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. गोपनीय पद्धतीने मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात येऊन संबंधित विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आलेल्या क्षेत्रीय अधिकारी, मतदान अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी गृहमतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. या वेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी निवडणूक आयोगाचे आभार मानले.

# रोहा शहरातून ना. आदिती तटकरे यांना मताधिक्य देण्याचा कार्यकर्त्यांचा निर्धार

**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या रोह्यात राष्ट्रवादीसह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी श्रीवर्धन मतदारसंघाच्या महायुतीतील राष्ट्रवादीच्या उमेदवार ना. आदिती तटकरे यांना मताधिक्य देण्यासाठी जोरदार प्रचार करीत आहेत. छत्रपती शिवाजीनगर, हनुमान नगर, मंगळवाडी येथे महायुतीचे कार्यकर्ते सोमवारी (दि.११) सायंकाळी ना. आदिती तटकरे यांचा प्रचार करताना दिसले.



या प्रचारफेरीत माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, ललीत गुजर, दिलीप तलवार, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, भाजप शहराध्यक्ष यज्ञेश भांड, महिलाध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, काशिनाथ घाटावकर, जितेंद्र पडवळ, नितीन पिंपळे, भाजपचे वैभव कुलकर्णी, स्वप्निल धनावडे, अजित मोरे, तुषार मोरे, राज बामुगडे, चंद्रकांत पार्टी, राजेंद्र जैन, भाऊ शेलार, महेश सरदार, स्नेहा आंब्रे, शिल्पा धोत्रे, रुचिका जैन आदी सह छत्रपती शिवाजी महाराज नगर, हनुमान नगर या परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते.

आतापर्यंत रोहा शहरात महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, शासन दरबारी आईच्या नावाची नोंद करणे, मुलींचे शिक्षण आदी लोकाभिमुख योजना त्यांनी तळागळात पोहचवल्यामुळे रोहा शहरातून मोठ्या प्रमाणात मताधिक्य देणार आहोत, असा निर्धार कार्यकर्त्यांनी बोलून दाखविला.

# नोव्हेंबर मध्यापर्यंतसुद्धा गुलाबी थंडीची प्रतीक्षा कायम

**नागपूर : प्रतिनिधी**

दिवसरात्रीचे तापमान चढ-उतार बघायला मिळत आहे. रविवारी किमान तापमानात अनपेक्षितपणे २ अंशांची वाढ झाली होती, मात्र सोमवारी त्यात पुन्हा २.८ अंशाची घसरण होत रात्रीचा पारा १७.६ अंशावर गेला. पारा घसरल्याने रात्री अधिक गारवा जाणवायला लागला आहे.

ऑक्टोबर हीटचा सामना करणाऱ्या नागपूरसह विदर्भातील नागरिकांना लवकर थंडी सुरू होईल अशी अपेक्षा होती, मात्र नोव्हेंबरचा दुसरा आठवडा सुरू झाला असताना थंडीची हवी तशी जाणीव होत नसल्याने लोकांची चिंता वाढली होती. हवामान विभागाने १५ नोव्हेंबरपर्यंत थंडीचा जोर वाढेल, असा अंदाज व्यक्त केला. त्यानुसार हळूहळू पारा घसरत चालला आहे.

पंजाब, हिमाचल प्रदेशासह उत्तर भारतातील काही प्रदेशात पारा घसरून धुके दाटायला लागले आहेत. दुसरीकडे कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या दक्षिणकेडील राज्यात पावसाळी वातावरण तयार झाले आहे. या दोन भागातील वातावरणाचा प्रभाव मध्य भारतात दिसून येत आहे, मात्र यापुढे थंडीत वाढ होईल, अशीच शक्यता वर्तविली जात आहे.

विदर्भात भंडाऱ्यात सर्वाधिक २२ अंश किमान तापमानाची नोंद झाली. दुसरीकडे शेजारचे गोंदिया शहर सर्वात थंड ठरले. येथे सर्वांत कमी १६.८ अंश किमान तापमानाची नोंद झाली आहे. चंद्रपूर व गडचिरोली १७ अंशावर आहेत. नागपूरसह पूर्व विदर्भातील जिल्ह्यात कमाल तापमान सरासरीत आले असल्याने उन्हाची व उकाड्याची जाणीव कमी व्हायला लागली आहे. येत्या काही दिवसांत थंडीचा जोर हळूहळू वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

# खारघरमध्ये सोनेरी कोल्हा मृतावस्थेत

**नवी मुंबई, पनवेल : बातमीदार, वार्ताहर**



खारघरमधील सेक्टर १५मध्ये रविवारी (दि.१०) रात्री ११.३० वाजता खारघरवासीयांना सोनेरी कोल्हा मृतावस्थेत आढळला. यामुळे पुन्हा एकदा वन्यजीवांच्या संरक्षणाचा मुद्यावर पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

खारघरमध्ये काही महिन्यांपूर्वी सोनेरी कोल्ह्याचे अवशेष आढळले होते. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने नेमका त्या कोल्ह्याचा मृत्यू कशामुळे झाला याचे कारण समजू शकले नाही, मात्र रविवारी रात्री सेक्टर १५शेजारी डीएव्ही शाळेलगत सोनेरी कोल्हा मृतावस्थेत आढळल्याने प्राणीमित्रांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

वाहनाच्या धडकेत हा कोल्हा जखमी होऊन त्याचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे, मात्र अजूनही नेमके कारण समजू शकले नाही.

पान १ वरुन

## राहुल गांधींच्या अनेक पिढ्या आल्या तरी संविधान बदलू शकणार नाहीत!

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार देशात रूजवण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले अविरत कष्ट करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणूक लढवत असताना तुमच्यासारख्यांचा आशीर्वाद मिळावा. १४ तारखेला खारघरला पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार आहेत. त्यामुळे थोरा मोठ्यांचे आशीर्वाद माझ्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नम्रपणे सांगितले.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांचीही समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविक भाजप जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार यांनी केले.

या सभेला अनुसूचित जाती सेलचे जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक विकास घरत, डॉ. अरुणकुमार भगत विजय चिपळेकर, दिलीप पाटील, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, भाजप कामोठे सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य हॅप्पी सिंग, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, विद्या तामखडे, हरजिंदरकौर सिंग, युवा मोर्चा शहर अध्यक्ष तेजस जाधव, मयुर मोहिते, शितल कसबे, अनिता शेट्टी, ज्योती रायबोले, पूजा साळवी, रवी गोवारी, आरपीआयचे मोनिश गायकवाड, अशोक निकम, शरद पाटील, अजिंक्य शिंदे, दिनेश जाधव, अंकुश साळवे, प्रवीण जाधव, संतोष सोनकांबळे, मल्हारी घाटविसावे, मिलिंद कांबळे, सुरेंद्र सोरटे आदी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# आचारसंहिता भंगाच्या तक्रारीसाठी प्रशासनाकडून टोल फ्री क्रमांक जारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता भंगच्या तक्रारीसाठी जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे टोल फ्री संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून निवडणूक आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी तात्काळ सुरू झाली आहे. नागरिकांना आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करावयाच्या असल्यास त्यांनी (०२१४१-२२२११८) आणि (१९५०) टोल फ्री क्रमांकावर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. या कक्षाद्वारे तातडीने तक्रारीची दखल घेण्यात येईल. हा कक्ष २४ तास सुरू राहणार असून त्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षाला आलेल्या तक्रारीनुसार भरारी पथके आवश्यक कारवाई करतील, असेही जिल्हा निवडणूक अधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले आहे.

निवडणूक आयोगामार्फत सी-व्हिजील ॲपची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. कोणत्याही सामान्य नागरिकाला जर निवडणुकीत काही अफरातफर दिसून आली तर या पवर जाऊन त्याची माहिती द्यायची आहे. फोटो अपलोड करण्याचीही सुविधा आहे. ज्या व्यक्तीने तक्रार दाखल केली त्याच्या लोकेशनवरून निवडणूक आयोग सदर परिसराचा माग काढेल आणि १०० मिनिटांच्या आत आयोगाचे पथक त्याठिकाणी दाखल होईल व आवश्यक ती कार्यवाही करेल, अशी माहिती जावळे यांनी दिली आहे.

# बोरी येथे आमदार महेश बालदींच्या कार्य अहवाल पुस्तिकेचे वाटप

**उरण : वार्ताहर**

उरण विधान मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांचा सर्वत्र प्रचार सुरू झाला आहे. शहरातील बोरी येथील भाजप कार्यकर्त्यांनी महेश बालदी यांनी केलेली विकासकामे, कार्य अहवाल पुस्तिकेचे वाटप कार्यकर्ते करीत आहेत.

बोरी गावात प्रत्येक घराघरांत जाऊन कार्यकर्त्यांनी पुस्तिकेचे वाटप केले. या वेळी उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उद्योजक सदानंद गायकवाड, जयंत सतेरे, संदीप पानसरे, निलेश कदम, प्रकाश ठाकूर, सुरेश शेलार, मंदार असरकर, विनय ठाकूर, विशाल पाटेकर, दिनेश पानसरे, हर्षद समेल, अमित नार्वेकर, धार्मिक पटेल आदी उपस्थित होते.



# महामार्गावरील दोन लुटारू गजाआड

## तळोजा पोलिसांची धडक कारवाई; चार गुन्हे उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

ओला, उबेर कार किंवा रिक्षा भाडे तत्वावर ऑफलाईन बुक करून निर्जनस्थळी लघवीच्या बहाण्याने उतरुन संबंधित चालकाच्या गळ्यावर चाकून ठेवून गाडीचा ताबा घेवून गाडीसह त्याल लुटून पळून जाणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून आतापर्यंत चार गुन्हे उघडकीस करण्यात आले आहेत.




तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा प्रकारचे दोन गुन्हे त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक गुन्हा व कल्याण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक गुन्हा अशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, निरीक्षक गुन्हे निकम, उपनिरीक्षक धुळगंडे, हवालदार मढवी, शिंदे, सावंत, पाटील, पोलीस कॉस्टेबल जाधव आदींच्या पथकाने या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांच्या आधारे अधिक माहिती घेतली.

या गुन्ह्यातील प्रमुख आरोपी सागर गोयल (२५ रा.कल्याण) व त्याचा सहकारी संतोष नाटेकर (२७ रा.कल्याण) हे हाजीमलंग कल्याण परिसरात लपल्याची माहिती मिळताच त्यांनी सलग तीन दिवस त्या ठिकाणी सापळा रचून या दोघांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून आतापर्यंत दोन लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यातील सेलेरिओ गाडी हस्तगत करण्यात आली आहे. या आरोपींमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# आमदार महेश बालदी यांना पीआरपीचा जाहीर पाठिंबा

**उरण : रामप्रहर वृत्त**

पीपल्स रिपब्लिकन पार्टी (पीआरपी)चे रायगड येथील जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे यांनी उरण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार महेश बालदी यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.



आमदार महेश बालदी यांची भेट घेत त्यांना पाठिंबा पत्र देण्यात आले. या वेळी जिल्हाध्यक्ष सिताराम कांबळे, युवा अध्यक्ष सचिन तांबे उपस्थित होते.

आमच्या पार्टीतर्फे आमदार महेश बालदी यांना जाहीर पाठिंबा देत आहोत, आमच्या पक्षाचे ग्रामीण भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी आपणास भरघोस मतांनी निवडून देतील, असे पाठिंब्या पत्रात नमुद केले आहे.

पीपल्स रिपब्लिकन पक्ष ग्रामीण भागात तळागाळात पोहचलेला आहे. तेथील कार्यकर्ते आणि पदाधिकारी माझ्यासोबत आहेत, याचा मला अतिशय आनंद आहे, असे आमदार महेश बालदी यांनी या वेळी म्हटले.

# माता भगिनींचा आशीर्वाद आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठिशी –दर्शना भोईर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरोधकांनी लाडक्या बहीण योजनेत खोडा घातला, मात्र महायुतीच्या सरकारने राज्यात तर कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये ही योजना यशस्वी केली. विविध योजना अंमलात आणल्या त्याचबरोबरीने पनवेलचा सर्वांगीण विकास केला. त्यामुळे माता भगिनींचा आशीर्वाद आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठीशी कायम आहे, असे प्रतिपादन महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केले.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना दर्शना भोईर यांनी पुढे सांगितले की, लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने सर्व समाजाचा विचार केला आहे. सुख दुःखात धावून जाणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख आहे. पनवेलचा विकास करताना त्यांनी कधीही राजकारण केले नाही. महायुती सरकारच्या माध्यमातून विविध जनकल्याणकारी योजना राज्यातील नागरिकांसाठी राबविण्यात आल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पनवेलमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रयत्न कामी आले. या योजने अंतर्गत एक लाखहून अधिक महिलांना त्याचा लाभ मिळाला. त्याचबरोबरीने त्यांनी रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला 'लाडक्या बहिणींचे लाडके देवाभाऊ' हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी थेट संवाद कार्यक्रम आयोजित करून आनंददायी सोहळा साजरा केला.

मातृवंदन, अन्नपूर्णा, मुलींना मोफत उच्च शिक्षण, शौचालय, उज्वला योजना, अशा विविध योजना महिलांसाठी राबविल्या जात असतानाच आरोग्याच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विविध उपक्रमे राबविले, त्यात गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर प्रतिबंधात्मक मोफत लसीकरण शिबीर यशस्वीपणे करत पनवेलमधील लेकींच्या आरोग्याची काळजी घेतली. निवडणूक प्रचाराचा वेग आला आहे, या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे शहरांबरोबरच ग्रामीण भागातही महिलांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करत भरभरून आशीर्वाद दिले जात आहे.

महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर महिलांकडून सरकारच्या या योजनेचे जोरदार स्वागत झाले. आणि तजलदगतीने या योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाली. आज राज्यातील कोट्यवधी महिलांना या योजनेचा फायदा झाला आहे. त्यामुळे ही योजना अशीच पुढे यशस्वीपणे चालू राहिली पाहिजे यासाठी महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन त्यांनी महिलावर्गाला केले. त्याचबरोबरीने महायुती सरकारने या योजनेच्या रक्कमेत वाढ करणार असल्याचे जाहीर करून लाडक्या बहिणींचा आणखी विचार केल्याबद्दल सरकारचेही त्यांनी आभार मानले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ प्रभाग १७मध्ये बाईक रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विकसित पनवेलचे शिल्पकार आमदार प्रशांत ठाकूर यांचा झंझवाती प्रचार संपूर्ण मतदारसंघात सुरू आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूरांकडे पुन्हा एकदा पनवेलचे नेतृत्व देण्यासाठी सज्ज झाले असून प्रभाग १७मध्ये भव्य बाईक रॅली काढून जोरदार प्रचार रविवारी (दि. १०) करण्यात आला. जनतेचा भरघोस प्रतिसाद या रॅलीदरम्यान आमदारांना लाभला.





जनतेच्या समस्या सोडवून त्यांना पाठीशी उभे राहणारे एक कर्तृत्ववान नेतृत्व असलेल्ये भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी माहायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संपुर्ण ताकदीने उतरले आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूरांचा विजयाचा चौकार मारण्यासाठी प्रभाग क्रमांक १७ मध्ये भव्य प्रचार रॅली काढण्यात आली होती.

या दरम्यान ठिकठिकाणी माता भगिनींना त्यांना ओवाळून त्यांचे स्वागत केले तसेच विजयासाठी शुभेच्छा दिल्या. या रॅलीमध्ये तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस चारुशीला घरत, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, तेजस कांडपीळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, ॲड. वृषाली वाघमारे, माजी उपनगराध्यक्ष सुनील घरत, सुभाष भुजबळ, उपाध्यक्ष संदीप पाटील, ॲड. जितेंद्र वाघमारे, ज्येष्ठ नेते सी.सी.भगत, अमरीश मोकल, जगदीश घरत, कमलाकर घरत, रवी नाईक, वर्षा नाईक, युवामोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, मयुर कदम यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# कळंबोलीत विविध घटकांबरोबर बैठका | आमदार प्रशांत ठाकूर यांना निवडून आणण्याचा निर्धार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभेचे कार्यसम्राट आमदार माननीय प्रशांत ठाकूर यांना निवडून आणण्यासाठी निवडणुकीचे सूक्ष्म प्लॅनिंग करून समाजातील विविध घटकांबरोबर बैठकांचे सत्र सुरू आहे गोव्याचे आमदार व सरचिटणीस दयानंद सोपटे तसेच संघाचे माधव गांगुर्डे व कळंबोलीतील ज्यांच्यावर जबाबदारी आहे असे धडाडीचे भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी कळंबोलीतील संपूर्ण परिसर पिंजून काढला.

वेगवेगळ्या समाजाबरोबर बैठका घेतल्या त्यामध्ये प्रामुख्याने पंजाबी समाजासमोर बैठक झाली. या बैठकीमध्ये त्यांनी समाजातील अशा काही घटकांवर प्रकाश टाकला. कळंबोलीच्या परिसरामध्ये ड्रग्स माफिया तसेच गांजा चरस अशा गोष्टींनी थैमान मांडलेले आहे, तक्रारी करूनसुद्धा पोलिसांकडून हवी तशी कारवाई होत नाही त्यामुळे त्यांनी अशी मागणी केली आहे की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत बैठक घेऊन पोलिसांच्या वरच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन या सर्व गोष्टींचा निपटारा करायचा आहे.

तरुण पिढी जर व्यसनाधीन झाली तर समाजाचे भवितव्य अवघड आहे हे ओळखून पंजाबी समाजातील काही तरुणांनी त्यांच्या ह्या व्यथा व कहाण्या आमदार दयानंद सोपटे यांच्यासमोर मांडल्या. त्यांनीही असे आश्वासित केले आहे की, या सर्व गोष्टी मी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमोर मांडेल व बबन बारगजे यांनी या लोकांना घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमोर निवडणूक झाल्यानंतर एक बैठक घालून द्यावी. त्याचप्रमाणे तृतीय पंथीयांचा मुंबई–पुणे हायवेवर रोज संध्याकाळी धुमाकूळ चालू असतो त्यावरसुद्धा बंधन यायला हवीत कारण येणाऱ्या जाणाऱ्यांना त्यांचा खूप त्रास होत आहे.





या वेळी बबन बारगजे यांनीसुद्धा सांगितले की, निवडणूक झाल्यानंतर या सर्व गोष्टीचा आम्ही मंडळातील पदाधिकारी व आपण सर्व मिळून या गोष्टींचा नायनाट करू. त्या सर्व लोकांनी सांगितले की आम्ही एक एक मत प्रशांत ठाकूर यांना देऊ व प्रचंड बहुमताने निवडून आणू. पंजाबी समाजाच्या बैठकीसाठी अमरजीत सिंग शाहविंदर सिंग मनराज सिंग मालकीत सिंग तुर्मित सिंह मान, लाडी सिंग निशांत गिल व प्रिन्स सोनी सहित अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

रविवार दिवस असल्याने दिवसभर बंजारा समाजाची बैठक झाली त्यामध्ये भगवान पवार, वसंतराव नाईक, गणपत राठोड, प्रेमचंद चव्हाण, गणेश आडे, विष्णू पवार, राहुल जाधव इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

बंगाली समाजाची बैठक काली माता मंदिर या ठिकाणी झाली या बैठकीमध्ये बरुण दास, दिनबहादूर सेन, जयदर बिश्वास, अमित दास गुप्ता, समीत दत्ता मनोज सिंग सहा सह संस्थेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

शिरवी समाज कळंबोली यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शिरवी समाजाचे नेते धनाराम चौधरी, रामलाल शिरवी नरेंद्र शिरवी, कानाराम शिरवी, जगदीश शिरवी, प्रतापराम शिरवी मानारामशिरवी सुखाराम शिरवी इत्यादी प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. उत्तराखंड समाजाबरोबर झालेल्या बैठकीत प्रमोद सिंग राणा, गब्बरसिंग पवार, हयात सिंग नेगी, सुमेर सिंग नेगी, सुरत सिंग राणा, धुमसिंग पवार गंगासिंग नेगी व दिगंबर रावत उपस्थित होते.

राजस्थान सेवा संघ यांच्यासोबत बिमा कॉम्प्लेक्स येथे बैठक झाली या बैठकीमध्ये प्रदीप कस्वा, शाम पारिख मधुसूदन सोनी, मुकेश शर्मा, अनिल जैन , सुशील शर्मा, सुरेख पारिख, प्रमोद सोनी, कृष्णकांत सोनी इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मल्याळम समाज यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये प्रकाश करिपल्ली, लक्ष्मणन पटाणी, श्रीधरन नायर शशिकुमार उन्नी कृष्णन शाहीद बाबू एक व्ही इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या सर्व बैठकांना आमदार दयानंद सोपटे व बबन बारगजे यांनी मार्गदर्शन केले व येणार्या काळात होणार्या निवडणुकीमध्ये आमदार प्रशांत दादा ठाकूर यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे सर्वांनी आश्वासन दिले.

# माथाडी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोलीमध्ये झालेल्या माथाडी कामगार मेळाव्यात आमदार प्रशांत ठाकूर यांनी माथाडी कामगासोबत संवाद साधून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कटीबद्ध असल्याचा विश्वास कामगारांना दिला.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ माथाडी कामगार मेळावा आयोजित केला होता. कामगारांच्या हितासाठी पडेल तो संघर्ष करण्याची तयारी भाजपची आहे, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

या मेळाव्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, शिवसेना पनवेल जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे, भाजपचे माथाडी कामगार ट्रान्सपोर्ट सेलचे उपाध्यक्ष संजय भगत, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, माजी नगरसेविका मोनिका महानवर, अमर ठाकूर, अशोक मोटे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार उपस्थित होते.






# कळंबोलीतील शेकडो रहिवाशांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांचे सक्षम नेतृत्व मान्य करून कळंबोलीतील शेकडो रहिवाशांनी भाजपच्या विकासाचे कमळ हाती घेतले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रवेश कर्त्यांचे स्वागत केले तसेच त्यांनी ज्या ज्या समस्या सुचवल्या त्या येत्या दोन ते तीन महिन्यांमध्ये सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही दिली.





आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्यामुळे तसेच प्रयत्नांमुळे अनेक विकासाची कामे मतदार संघात झाली आहेत. त्यांच्या या कार्यक्रणालीवर विश्वास ठेऊन गगणदीप सिंग यांच्या नेतृत्वाखाली कळंबोलीतील संदीप कौर, नीता राजगे, विजया कुशवहा, शर्मिला दोंदे, शैला दोंदे, स्वाती बोडरे, जया नायर, मनजीत कौर, शितल खरजे, रीना सिंग, इंद्रजीत कौर, रेखा बिष्ट, वैशाली पवार, सरबजीत कौर, बेबी नायर, स्मीता नायर, गीता भाटला, योगीता पाटील, लालसा सिंग, पूनम सिंग, सुजाता शिवहरे, हरजीत कौर, शशिकला जंबूकर, शैलेंद्र बोडरे, प्रबज्योत सिंग, अनिल सुतार, सुखवींदर सिंग, किरण कदम, संदीप पाटील, मोहम्मद खुशनूरशेख, सइदाम शेख, विशाल राजगे, गुरविंदर सिंग, अशोक बोडरे, जगदीश बिष्ट, नरेंद्र सिंग, समाधान खरजे, अंशोक चंदणे, सतीत्र निवाळी मुकेश शिवमदार, विशाल सिंग, सतनारायण सिंग, राकेश कश्याप, मंथन मिश्रा, उत्तम पाटील, दत्तात्रय मोरे, यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहिर पक्ष प्रवेश केला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत केले तसचे रहिवश्यांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवणार असल्याची ग्वाही दिली.

या पक्षप्रवेशावेळी शिवसेनेचे पनवेल जिल्हा अध्यक्ष रामदास शेवाळे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजू शर्मा, माजी नगरसेविका मोनिक महानवर, रामा माहनवर, अमर ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय

# कौशल्य गणनाच हवी

**एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी गरीब, महिला, युवक आणि शेतकरी याच चार जाती मानत असून त्यांच्या आधारावरच भारतीय जनता पक्ष विकास करणार आहे तर दुसरीकडे काँग्रेसचे राहुल गांधी मात्र लोकसभेप्रमाणे महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीतही जातिनिहाय जनगणनेचे तेच तुणतुणे वाजवत आहेत. महायुतीने आपल्या संकल्पपत्रात दूरदृष्टीने कौशल्य गणनेचा उल्लेख केला आहे. विरोधक बेरोजगारीच्या नावाने निव्वळ बोंब मारत असताना भाजपने मात्र या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी कौशल्यगणना करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.**

**विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या संकल्पपत्राचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते रविवारी झाले. देशातील जनतेला दिलेल्या आश्वासनांपैकी अनेक आश्वासने सत्तेवर आल्यापासून पूर्ण करणाऱ्या भाजपने समाजाच्या सर्व घटकांचा विचार करून आपले संकल्पपत्र तयार केले आहे. महाराष्ट्र राज्य गुंतवणूक आकर्षित करून घेण्यात आजही क्रमांक एकचे राज्य आहे हे वास्तव असताना विरोधक मात्र राज्यात तरुणांच्या हाताला काम नाही अशी आवई उठवत आहेत. खरे तर ज्या तरुणांना या समस्येला तोंड द्यावे लागत आहे ते काँग्रेस पक्षाच्या काळातील चुकीच्या शिक्षण पद्धतीचे बळी आहेत. काँग्रेसच्या कालबाह्य शिक्षणपद्धतीमुळे काही विद्यार्थ्यांकडे पदवी तर आहे, परंतु कौशल्य नाही. त्यामुळे त्यांना नोकरीच्या संधी मिळण्यात अडथळे येत आहेत. महायुतीचे सरकार याच संदर्भातली नेमकी आकडेवारी जमवण्यासाठी कौशल्य गणना करणार आहे. यातून जे चित्र समोर येईल त्यानुसार तरुणांकरिता कौशल्यविकासाच्या नेमक्या योजना राबवता येणार आहेत तसेच शिक्षणपद्धतीतही आणखी सुयोग्य बदल करून काही कौशल्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमातच केला जाणार आहे. बेरोजगारीवर महायुतीकडून अशाऱ्हेने सकारात्मक उपाययोजनेचे उद्दिष्ट ठेवले जात असताना काँग्रेस पक्ष मात्र देशात संधींचे असमान वाटप झाल्याची ओरड करून हिंदू धर्मातील जातिपातींमध्ये तेढ निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहे. लोकसभा निवडणुकांपासून काँग्रेस पक्ष सातत्याने जातिनिहाय जनगणनेविषयीच बोलत आहे. निव्वळ मतांसाठीच काँग्रेस पक्ष या मुद्याचा वापर करतो आहे हे उघड आहे. जातिनिहाय जनगणना ही अतिशय संवेदनशील बाब असून तिचा वापर निवडणुका व राजकारणासाठी केला जाता कामा नये अशी भूमिका भाजपने कायम घेतली आहे. स्वातंत्र्यानंतर प्रदीर्घ काळ सत्तेत असताना काँग्रेस पक्षाने जातिनिहाय जनगणनेचा विचार का केला नाही हा प्रश्न जनतेने त्या पक्षाला विचारला पाहिजे. जातिनिहाय जनगणनेची मागणी संसदेने करूनही तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारने ती केली नाही हेही यासंदर्भात लक्षात घेतले पाहिजे. या मुद्याच्या आधारे हिंदु समाजातील जातिजातींमध्ये तेढ निर्माण करून त्याआधारे मते मिळवण्याचे कारस्थान यामागे दिसते. यासंदर्भात बोलताना राहुल गांधी जातिपातींमध्ये तेढ निर्माण करणारा विखार ओकत आहेत. आर्थिकदृष्ट्या मागास जातींना आरक्षण मिळवून देण्याचा हेतू यामागे असल्याचे काँग्रेस पक्ष भासवत असला तरी हिंदू मतांमध्ये फूट पाडण्याचाच हेतू त्यामागे असावा. आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा काढून टाकण्याचे आश्वासनही हा पक्ष देतो आहे. हिंदूंमध्ये फूट पाडायची झाल्यास जात हा सर्वांत सोपा मुद्दा ठरतो हे ओळखूनच हा डाव खेळला जात आहे. उद्या काँग्रेस पक्ष मुस्लिम समाजही मागास आहे, असे भासवून त्यांच्याकरिताही आरक्षणाची मागणी करेल. काँग्रेस पक्षाच्या या मनसुब्यांचा जनतेने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.**

# महाडच्या ग्रामीण भागात माकडांचा वाढता वावर

**खबरबात**
**महेश शिंदे**

गेल्या काही वर्षात महाड तालुक्यातील ग्रामीण भागात जंगलात राहणाऱ्या माकडांनी गावाची वाट धरल्याने शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. गावात नासधूस करणाऱ्या या माकडांनी शेतात देखील धुडगूस घातला आहे. या माकडांच्या टोळ्यांकडून शेतात केल्या जाणाऱ्या पालेभाज्या, नाचणी, शेतात असलेल्या फळांची नासधूस केली जात आहे. यातून अनेक शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले आहे.

मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड, जमीन खरेदी विक्री, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, जंगलात वाढलेला मानवी हस्तक्षेप आदी कारणामुळे ग्रामीण भागात गावागावात जंगलात वास्तव्यास असलेल्या माकडांच्या टोळ्या गावात दाखल होत आहेत. शेतकरी एकदा का शेतात कामाला गेला की, या माकडांचा उपदव्याप सुरू होत आहे. तालुक्यातील दाभोळ गावातील ग्रामस्थ तर हा त्रास गेली अनेक वर्ष ओढत आहेत. घरांचे कौल उखडून घरात प्रवेश करत धान्याची नासाडी, घरातील सामानाची नासधूस केली जात आहे. हि परिस्थिती आता तालुक्यातील डोंगर भागात वास्तव्यास असलेल्या गावांमध्ये दिसू लागली आहे. भात पिक काढल्यानंतर शेतकरी कडधान्य, इतर पालेभाज्या काढण्यावर भर देतो मात्र गेली कांही वर्षात माकडांचा त्रास वाढल्यामुळे शेतकरी शेतात जाण्यासदेखील धजावत आहे. शेतात लावल्या जाणाऱ्या पालेभाज्या, बांधावर असलेल्या फळांची कडधान्याची रोपे उखडून काढली जात आहेत. नासधूस करत या टोळ्या पुन्हा जंगलात जात आहेत. यापूर्वी कधीतरी दिसणारे हे चित्र आता दररोज होत असल्याने शेतकरीदेखील हैराण झाले आहेत.


महाड तालुक्यात बहुतांश भाग हा दुर्गम, डोंगर भागात वसलेला आहे. अनेक गावे हि डोंगराला लागुनच आहेत. जंगलात पूर्वी प्रमाणे वन्य प्राण्यांना सहज उपलब्ध होणारी फळे, खाद्य दुर्मीळ झाली आहेत. गावातील तरुण शहरात दाखल होवून घरे बंद झाली असली तरी गावाशेजारी असलेल्या जमिनी मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्यामुळे प्लॉटिंगच्या नावाखाली वन तोड केली जात आहे. यामुळे वन्य प्राण्यांचे घरच मानवी हस्तक्षेपामुळे उद्ध्वस्थ होत आहे. त्यातच भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस घटत असल्याने जंगलात असलेले पिण्याचे पाण्याचे स्त्रोतदेखील आटले आहेत. यामुळे वन्य प्राण्यांनी खाद्य आणि पिण्याच्या पाण्यासाठी गावाची वाट धरली आहे. माकडांच्या टोळ्यांसह डुक्कर, खवले मांजर आदी वन्य जनावरे गावाशेजारी असलेल्या शेतात येऊन नासधूस करत आहेत.

महाड तालुक्यात विन्हेरे, फौजी आंबवडे, आंबिवली, दाभोळ, वरंध, पारमाची, माझेरी, वारंगी, रायगड वाडी, देशमुख कांबळे, शिवथर, आदी गावातून माकडांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या गावातून होत असलेल्या शेतातील पालेभाजी, नाचणी, वरी, आदीचे मोठे नुकसान केले जाते. वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी यापूर्वी शेतकरी पारंपारिक उपाय म्हणून वाद्य वाजवणे किंवा शेतात वास्तव्य करून शेकोटी पेटवणे हे उपाय काळाच्या ओघात मागे पडले आहेत. शेतात वास्तव्य किंवा वाद्य वाजवणे शेतकऱ्यांनी आता सोडून दिले आहे. तरुणांनी नोकरीनिमित्त शहर गाठल्याने गावात आता फक्त वयोवृद्ध नागरिक राहत असल्याने ज्यांना शक्य होते तेच शेती करत आहेत. यामुळे वन्य प्राण्यांनी शेतात आपला वावर वाढवला आहे.

याबाबत स्थानिक पातळीवर असलेल्या शासकीय यंत्रणांना देखील शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. कृषी आणि वन विभागाने सयुंक्तपणे याबाबत पावले उचलली पाहिजेत. वन विभागाने या माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना यापूर्वी फटाके भेट दिले होते. मात्र फटाके वाजवल्या नंतर कांही तास माघारी पडलेल्या माकडांच्या टोळ्या पुन्हा शेतात दाखल होतात. यामुळे वन्य प्राण्यांना जंगलातच खाद्य आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याबाबत किंवा जंगलातील कांही भाग संरक्षित करून त्यामध्ये फळांची रोपे, आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध केल्यास हा त्रास कमी होण्याची शक्यता आहे. वन विभाग आणि कृषी विभागाने याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

वन्य प्राण्यांचा वावर शेतात वाढू लागल्याने शेतीचे मोठे नुकसान होत आहे. घराशेजारी असलेले कोकम, आंबा, पेरू, पपई आदि फळेदेखील तोडून टाकली जातात. पालेभाजी उखडून टाकली जात असल्याने शेतकरी नुकसान सहन करत आहे. वन विभाग आणि कृषी विभागाने याबाबत कार्यवाही करावी, असे महाड येथील किसान क्रांती संघटनेचे अध्यक्ष तुकाराम देशमुख यांनी सांगितले.

# बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला



बहाई धर्माचे संस्थापक. बहाउल्ला वा बहाअल्लाह ही इराणमधील मिर्झा हुसेन अली नूरी यांनी धारण केलेली एक उपाधी होय. 'वहा' या फार्सी शब्दाचा अर्थ प्रकाश, तेज वा ऐश्वर्य असा आहे. म्हणून 'बहाउल्ला' म्हणजे 'ईश्र्वरी तेज' असा अर्थ होतो. त्यांनी आपण ईश्वरी आविष्कार आहोत अशी घोषणा केलेली असल्यामुळे 'बहाउल्ला' ही उपाधी धारण केली.

इराणच्या एका खानदानी कुटुंबात त्यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८१७ रोजी झाला. त्यांचे वडील इराणी शहाच्या मंत्रिमंडळात होते. बहाउल्ला यांना मात्र राजकीय महत्त्वाकांक्षा नव्हती. ते लहानपणापासूनच धार्मिक होते आणि दैवी चमत्कार करून लोकांना प्रभावित करीत होते. ते कधीही शाळेत गेले नव्हते. १८४७ च्या सुमारास त्यांनी बाबचे शिष्यत्व पतकरले. बाब व बहाउल्ला यांची प्रत्यक्ष भेट मात्र झाली नव्हती. पुढे बाबच्या हत्येनंतर त्यांच्या दोन अनुयायांनी इराणच्या शहाचा वध करण्याच्या अयशस्वी प्रयत्न केला. बहाउल्लांना या कटाची माहिती नव्हती, तरीही त्यांना अटक करण्यात आली, त्यांचा छळ करण्यात आला. याच काळात त्यांना काही दृष्टांत झाले आणि आपल्या हातून ईश्वरी कार्य होणार असल्याची जाणीव त्यांना झाली. सुटकेनंतर ते बगदादला (इराक) आले. बाबने आपला आध्यात्मिक वारस म्हणून बहाउल्लांचा सावत्र भाऊ मिर्झा यह्या ऊर्फ सुबह–इ–अझल याची नेमणूक केली होती परंतु तो वयाने लहान व एकांतप्रिय असल्यामुळे बाबी पंथाच्या नेतृत्वाची जबाबदारी अप्रत्यक्ष रीत्या बहाउल्लांवरच येऊन पडली. बगदादला आल्यावर त्यांनी दोन वर्षे (१९५४ – ५६) कुर्दिस्तानमध्ये एकांतात व्यतीत केली. हा त्यांच्या आध्यात्मिक तयारीचा काळ मानला जातो.

आपल्या विचारांच्या प्रचारार्थ त्यांनी शंभरांहून अधिक पुस्तके लिहिली. त्यांपैकी अल्–किताब अल् अक्–दस (पवित्रतम ग्रंथ), किताब–इ–ईकान (द बुक ऑफ सर्टिट्यूड), कलामत–ए–माक्नून (हिड्न वर्डस) इ. प्रसिद्ध होत. त्यांशिवाय त्यांच्या अनेक प्रार्थना, उपदेशपर वचने इ. प्रसिद्ध आहेत. त्यांचे ग्रंथ हे बहाई धर्माचे धर्मग्रंथ असून सध्याच्या युगासाठी ते ईश्वरानेच आविष्कृत केले आहेत, असे बहाई लोक मानतात. बहाउल्लांनी सर्व मानवजातीचे ऐक्य, विश्वशांती, परस्परांवरील प्रेम इ. तत्त्वांचा प्रसार केला. कर्मकांड, पुरोहित इत्यादींना स्थान ठेवले नाही. सर्व धर्मांचे सार एकच आहे, विश्र्वनिर्माता ईश्वर अज्ञेय आहे, सर्व ईश्वरी दूत एकच आहेत, ईश्र्वरी दूत सर्व कालांत अवतरत असल्यामुळे कोणीही शेवटचा प्रेषित नव्हे इ. सिद्धांत त्यांनी मांडले. फबहाई धर्म. मानवजातीला संकुचितपणापासून व्यापकतेकडे व कलहापासून सहकार्याकडे नेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी आपला ज्येष्ठ पुत्र अब्बास एफेंडी ऊर्फ अब्दुल–बहा (तेजाचा सेवक) याला आपला आध्यात्मिक वारस नेमले आणि आपल्या तत्त्वांचे स्पष्टीकरण करण्याचा अधिकार त्याला दिला.

बहाई लोकांच्या मते बहाउल्ला हा हिंदूंकरिता कृष्णाचा वा कल्कीचा अवतार आहे. तसेच, बौद्धांकरिता पाचवा बुद्ध, यदुही लोकांकरिता सनातन पिता, मुसलमानांकरिता पुन्हा प्रकट झालेला इमाम आणि ख्रिस्ती लोकांकरिता पुनरागत ख्रिस्त आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# ड्रायव्हिंग लायसन्ससाठी 'हे' ॲप्स इन्स्टॉल करा

ट्रॅफिक टाळण्यासाठी सरकारने सर्वसामान्यांना डिजिलॉकर ॲपची सुविधा दिली आहे. म्हणजे आजच्या काळात कार किंवा बाईकची फिजिकल डॉक्युमेंट्स सोबत बाळगण्याची गरज नाही. वाहन मालक डिजिलॉकर ॲपच्या मदतीने कागदपत्रे दाखवू शकतो, जो पूर्णपणे वैध असेल.



आता वाहतूक पोलीस त्यांच्या मोबाईलमधून क्यूआर कोड स्कॅन करून ड्रायव्हर आणि वाहनाशी संबंधित सर्व आवश्यक माहिती मिळवू शकतात तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याची नोंदही डिजिटल पद्धतीने ठेवता येणार आहे.

**नियम नेमके काय आहेत जाणून घ्या?**

आयटी ॲक्टनुसार ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र, विमा अशा कागदपत्रांच्या प्रत्यक्ष प्रती दाखवणे बंधनकारक नाही.

डिजिलॉकर आणि एमपरिवहन ॲपवर उपलब्ध कागदपत्रांची डिजिटल प्रत वैध मानली जाईल, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारने सर्व राज्यांच्या परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांना यासंदर्भात सूचनाही दिल्या आहेत.


आता वाहतूक पोलीस त्यांच्या मोबाईलमधून क्यूआर कोड स्कॅन करून ड्रायव्हर आणि वाहनाशी संबंधित सर्व आवश्यक माहिती मिळवू शकतात. तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याची नोंदही डिजिटल पद्धतीने ठेवता येणार आहे.

या फीचरचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम तुम्ही तुमच्या स्मार्टफोनमध्ये डिजिलॉकर आणि एमपरिवहन ॲप डाऊनलोड करावे. ॲपमध्ये नोंदणी करण्यासाठी आपला मोबाइल नंबर प्रविष्ट करा आणि ओटीपी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करा. त्यानंतर तुमचे युजरनेम आणि पासवर्ड सेट करून ॲपमध्ये लॉग इन करा.

आता तुम्हाला तुमचा आधार क्रमांक डिजिलॉकर ॲपमध्ये लिंक करावा लागेल आणि ओटीपीद्वारे त्याची पडताळणी करावी लागेल. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तुम्ही तुमचा ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) आणि विम्याची डिजिटल प्रत डिजिलॉकरवरून डाऊनलोड करू शकाल.

एमपरिवहन ॲपमध्ये वाहन मालकाचे नाव, वाहनाच्या नोंदणीची तारीख, मॉडेल क्रमांक, विम्याची वैधता आदी सर्व आवश्यक माहिती असते. अशा प्रकारे या ॲप्सचा वापर करून तुम्ही कोणत्याही त्रासाशिवाय वाहतूक पोलिसांना आवश्यक कागदपत्रे दाखवू शकता आणि चालान टाळू शकता.

# सशस्त्र क्रांतिकारक सेनापती बापट



## निमित्त


सेनापती बापट सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक. पूर्ण नाव पांडुरंग महादेव बापट. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरणग्रस्त गावांकरिता व शेतकऱ्यांकरिता बापट यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातील जे शेकडो सत्याग्रही सामील झाले त्यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यामुळे 'सेनापती बापट' या शब्दावलीने ते ओळखले जाऊ लागले. सेनापती बापट यांचा आज स्मृतीदिन आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथे गरीब कुटुंबात जन्म झाला. आईचे नाव गंगाबाई. माध्यमिक आणि बी.ए. पर्यंतचे उच्च शिक्षण मुख्यत्वे करून पुणे येथे झाले. डेक्कन कॉलेजमध्ये सशस्त्र क्रांतीच्या द्वारे भारत स्वतंत्र करण्याची शपथ तलवारीवर हात ठेवून घेतली. बी.ए. परीक्षेत १९३ साली उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाचे शिष्यवृत्ती मिळवून ते इंग्लंडला गेले. एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक विचारांचा प्रचार करीत असल्यामुळे शिष्यवृत्ती बदं होऊन शिक्षण अपुरे राहिले.

श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारक नेत्याशी परिचय होऊन त्यांच्या मदतीने पॅरिस येथे राहून तेथील रशियन क्रांतिकारकांकडून प्रचंड स्फोटक बाँबची तंत्रविद्या हस्तगत केली. त्या तंत्रविद्येची पुस्तिका भारतात व बंगालमधील क्रांतिकारक गटांपर्यंत पोहचविली. क्रांतिकारकांच्या कटाच्या एका खटल्यात माफीच्या साक्षीदाराने बापटांचे नाव उघडकीस आणल्यामुळे बापट हे १९८ ते १९१२ पर्यंत चार वर्षे अज्ञातवासात राहिले. नंतर १९२१ पर्यंत स्वत:च्या जन्मगावी शिक्षक म्हणून राहिले आणि समाजसेवेचे व्रत घेतले. पहाटे उठल्याबरोबर गावचे रस्ते झाडणे व शौचकूप साफ करणे हे व्रत त्यांनी जन्मभर स्वीकारले. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालविले. या आंदोलनात कारागृहवासाची तीनदा शिक्षा त्यांना झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेत असताना राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल अनेकदा अनेक वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

संस्थानी प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या आंदोलनात भाग घेऊन संस्थानाच्या प्रवेशबंद्या त्यांनी मोडल्या; त्याबद्दल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढ विरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. आंदोलन करीत असताना कारागृहात आंदोलनाला पूरक अशा तऱ्हेचे साहित्य लिहिले व ते प्रकाशित केले. त्यांनी अपुरे राहिलेले छोटेसे आत्मचरित्र लिहिले आहे. बरेचसे लेखन मराठीत व थोडे इंग्रजीत व संस्कृतमध्ये केले; लेखनाला पद्याकार दिला. क्रांतिवादी राजकारणाचे समर्थन करणारे, भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले, राष्ट्रमुक्ती व अन्याय प्रतिकार या दोन मुद्यांना अनुसरून युक्तिवाद केलेले हे साहित्य आहे. चैतन्यगाथा हे पुस्तक वाचले म्हणजे त्यांचे मूलभूत विचार लक्षात येतात. मराठीमध्ये योगी अरविंदांच्या इंग्लिशमधील आध्यात्मिक तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा उत्कृष्ट अनुवाद बापटांनी केला आहे. अरविंदांचा दिव्यजीवन हा मोठा ग्रंथ बापटांनी प्रसन्न शैलीने मराठीत उतरविला आहे. त्यांचे साहित्य समग्र ग्रंथ (१९७७) म्हणून साहित्य व संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रसिद्ध झाले आहे.


**(साभार : विकासपीडिया)**



# आरोग्य प्रहर

## खूप तहान लागल्याने होऊ शकतो 'हा' आजार

शरीर निरोगी ठेवायचे असेत तर दररोज पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. पाण्यामुळेच शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात, ज्यामुळे मनुष्य अनेक आजारांपासून दूर राहू शकतो. पाणी पिल्यानंतरच अन्न पचण्यासही मदत होते. याशिवाय वजन कमी करण्यासाठी पाणीदेखील उपयुक्त ठरू शकते. परंतु तुम्हाला माहिती आहे का, जास्त तहान लागणे देखील आरोग्यासाठी हानिकारक ठरु शकते.



जर तुम्हाला ही वारंवार तहान लागत असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. तुम्हाला जर जास्त तहान लागत असेल तर काळजी घेणे आवश्यक आहे. कारण हे कोणत्यातरी आजारांचे लक्षणंदेखील असू शकते.

**मधुमेह :** वारंवार तहान लागत असेल तर मग रक्तातील साखर वाढल्याचे हे लक्षण असू शकते. शरीरातील साखरेचे प्रमाण वाढले की, आपले शरीर लघवीद्वारे ती काढून टाकण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासते आणि जास्त तहान लागते.

**अशक्तपणा :** शरीरात हिमोग्लोबिनच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होतो. ही समस्या महिलांमध्ये जास्त दिसते. हे अनेक कारणांमुळे होऊ शकते, जसे की खराब आहार किंवा जास्त रक्तस्त्राव. या स्थितीत तुम्हाला जास्त तहानही लागते. यामध्ये चक्कर येणे, थकवा येणे, घाम येणे आणि इतर लक्षणेदेखील असू शकतात.

**वारंवार तोंड कोरडे पडणे :** तोंड कोरडे पडल्याने तहान लागण्याची समस्या निर्माण होते. अति धुम्रपान, जास्त प्रमाणात औषधे घेणे इत्यादींमुळेदेखील ही समस्या उद्भवते ज्यामुळे तोंड कोरडे पडण्याची समस्या वारंवार उद्भवते, ज्यामुळे तुम्हाला जास्त तहान लागते. तोंड कोरडे पडत असल्यास दुर्गंधी, चव बदलणे, हिरड्या जळणे आणि अन्न चघळण्यास त्रास होऊ शकतो.

**वारंवार लघवी होणे :** गर्भधारणेमुळेदेखील तहान लागण्याची समस्या उद्भवते. पहिल्या तीन महिन्यात रक्ताचे प्रमाण वाढते ज्यामुळे मूत्रपिंडात जास्त द्रव तयार होतो, ज्यामुळे वारंवार लघवी होते. याशिवाय शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे जास्त तहान लागते.

## क्लिक...क्लिक...!



पनवेल : घाटमाथ्यावरून मेंढपाळ आपल्या शेळ्या–मेंढ्यांना येथील ग्रामीण भागात चरण्यासाठी आणत असतात.

# महायुतीचे सरकार आणण्यात भरत गोगावलेंचा मोलाचा वाटा -आमदार दरेकर

**महाड : प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे सरकार आणण्यात आमदार भरत गोगावले यांचा मोलाचा वाटा आहे. उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि धनुष्यबाण काँग्रेसकडे गहाण ठेवले होते. जर त्यांचे सरकार सत्तेत राहिले असते, तर महाराष्ट्र अधोगतीकडे गेला असता. महायुतीचे सरकार आणून भरत गोगावले यांनी मोठी कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांना रेकॉर्डब्रेक मतांनी निवडून आणणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी असल्याचे आवाहन रविवारी (दि.१०) आमदार प्रवीण दरेकर यांनी केले.



आमदार भरत गोगावले यांच्या प्रचारार्थ नातेखिंड येथे भाजपच्या कार्यकर्त्यांची जाहीर सभा घेण्यात आली. त्या वेळी ते बोलत होते. सभेला शिवसेना युवा सेनेच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास गोगावले, भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, भाजपाचे महाड तालुकाध्यक्ष निलेश देवगिरकर, पोलादपूर तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, ज्येष्ठ नेते शेखर ताडफळे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रवींद्र तरडे आदी उपस्थित होते.

आमदार प्रवीण दरेकर पुढे म्हणाले की, भरत गोगावले यांनी महाड मतदारसंघासाठी ३६०० कोटींचा निधी आणला आहे. त्यामुळे त्यांना किमान ५० हजारांचे मताधिक्य मिळेल. यासाठी भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

शिवसेना युवा सेनेच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास गोगावले यांनी, आम्ही जातधर्म मानत नाही. माणूस ही एकच जात मानतो. लोकसभा निवडणुकीच्या काळात महायुतीविरोधात अपप्रचार करण्यात आला, पण आता केंद्रात सत्ता येऊन सहा महिने झाले आहेत. कुणाच्या केसालाही धक्का लागलेला नाही हे वास्तव आहे. आमदार भरत गोगावले यांच्या या विजयात आमदार प्रविणभाऊ दरेकर यांचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास व्यक्त केली.

डॉ. अजेय जोगळेकर, भाजपचे महाड तालुकाध्यक निलेश देवगिरकर, महिला मोर्चाध्यक्षा मंजुषा जोशी, पोलादपूर तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, जिल्हा सरचिटणीस बिपिन म्हामुणकर यांनीही मार्गदर्शन केले.

## रायगडात दिव्यांग, ज्येष्ठांचे होणार गृहमतदान

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आता शिगेला पोहचली आहे. ज्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग बांधवांना मतदान केंद्रांवर जाऊन मतदान करता येत नाही अशांसाठी निवडणूक आयोगातर्फे गृहमतदानाची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. त्यानुसार श्रीवर्धन, अलिबाग, उरण व कर्जत मतदारसंघात १४ ते १६ नोव्हेंबरदरम्यान गृहमतदान घेण्यात येणार आहे.



श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये माणगाव, तळा, रोहा, श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील पोस्टल बॅलेटकरिता ४७२ ज्येष्ठ नागरिक व ११६ दिव्यांग मतदारांनी घरुन मतदान करण्याकरिता अर्ज दिले आहेत. त्यानुसार १४ व १५ नोव्हेंबर रोजी गृहमतदान होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील दिली आहे. गृहमतदानाकरिता २८ पथके कार्यरत असणार आहेत. ही मतदान प्रक्रिया दोन दिवस सुरू राहणार आहे.

अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये अलिबाग, मुरूड, रोहा तालुक्यातील पोस्टल बॅलेटकरिता ४६१ ज्येष्ठ मतदार व २७ दिव्यांग मतदारांनी अर्ज दिले आहेत. त्यानुसार शुक्रवारी (दि.१५)गृहमतदान होणार आहे. गृहमतदानाकरिता ३७ पथके कार्यरत असणार आहेत. उरण विधानसभा मतदारसंघामध्ये ६८ ज्येष्ठ व १६ दिव्यांग मतदारांनी अर्ज दिले आहेत. त्यानुसार शुक्रवारी (दि.१५) गृहमतदान होणार आहे. याकरिता सात पथके कार्यरत आहेत.

कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये १७३ ज्येष्ठ व १६ दिव्यांग मतदारांनी अर्ज दिले आहेत. त्यानुसार १५ व १६ नोव्हेंबर रोजी गृहमतदान होणार आहे. यासाठी आठ पथके कार्यरत असणार आहेत. लोकशाहीच्या या उत्सवात मतदानाचे पवित्र कार्य पार पाडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले आहे.

## कर्जतमध्ये प्रमुख उमेदवारांचा प्रचार शिगेला

**खोपोली : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी टोकाला पोहचली आहे. नामनिर्देशनानंतरच्या पहिल्या आठवड्यात सर्वच प्रमुख उमेदवारांनी प्रचाराची जोरदार आखणी करून गावभेटी व घरोघरी जाऊन प्रचाराची मोहीम सुरू केली आहे.



कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात यंदाची निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनली आहे. महाविकास आघाडीचे नितीन सावंत, महायुतीचे महेंद्र थोरवे या दोन्ही उमेदवारांसमोर अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांनी कडवे आव्हान निर्माण केल्याने येथील निवडणूक चुरशीची बनली आहे. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात तिन्ही प्रमुख उमेदवारांना सारखाच प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. खरी रणधुमाळी अंतिम सप्ताहात पहावयास मिळणार आहे.

महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांच्यासोबत भक्कम पक्ष संघटन आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत व अपक्ष उमेदवार सुधाकर घारे हेदेखील आपआपल्या परीने प्रयत्न करीत आहेत.

निवडणुकीच्या दुसऱ्या व अंतिम टप्प्यात महेंद्र थोरवे सर्व ताकद पणाला लावत असून विविध संस्था, समाजघटकांचा पाठींबा त्यांना मिळत आहे. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी फौज त्यात नुकतेच माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, माजी जि. प. अध्यक्ष सुरेश टोकरे, उपाध्यक्ष भाई शिंदे यांच्या पक्षप्रवेशाने महेंद्र थोरवे यांना मोठे बळ मिळाले असल्याने थोरवे यांचा आत्मविश्वास वाढला आहे.

पहिल्या टप्प्यात कोणत्याही एका उमेदवारासाठी सकारात्मक वातावरण निर्मिती झाली नाही. त्यामुळे शेवटच्या सप्ताहात जो उमेदवार सर्व आघाड्यांवर टिकून राहील, तोच उमेदवार विजयाच्या स्पर्धेत राहणार असल्याने चित्र कर्जत मतदारसंघातील आहे.

## महायुतीच राज्यात स्थिर सरकार देईल -खासदार तटकरे

**मुरूड : प्रतिनिधी**

गेल्या लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने संविधान धोक्यात असल्याचे खोटे नेरेटिव्ह मतदारांमध्ये पसरवून काही अंशी संभ्रम करण्यात यशस्वी झाले, परंतु आगामी विधानसभेच्या निवडणुकीत विरोधकांच्या अपप्रचाराला सुज्ञ व सुजाण मतदार बळी पडणार नाहीत. देशाची एकात्मता ही सार्वभौम आहे. महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी राज्यात स्थिर सरकार आवश्यक असून महायुती ते देईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.



मुरूड येथे महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.१०) आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. या वेळी आमदार महेंद्र दळवी, भाजपचे रायगड जिल्हा चिटणीस ॲड. महेश मोहिते, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अतिक खतीब, मनोज भगत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजा केणी, मंगेश दांडेकर, संदीप पाटील, भरत बेलोसे, ऋषीकांत डोंगरीकर, स्मीता खेडेकर, हसमुख जैन, स्नेहा पाटील, दिनेश मिनमिणे आदी उपस्थित होते.



आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, मुरूड या पर्यटन नगरीच्या सर्वांगीण विकासासाठी २८७ कोटी रुपयांची कामे केली. सर्व समाजघटकांना न्याय दिला आहे. तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींमध्ये कोट्यवधींची कामे नियोजनबद्धरित्या केली आहेत. २०१९मध्ये मतदात्यांनी ३४ हजारांच्या मताधिक्याने मला विजयी करून कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी दिली. या वेळी ६८ हजार मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

भाजप नेते ॲड. महेश मोहिते यांनी, भाजपची टीम पूर्ण ताकतीने महायुतीच्या प्रचारकार्यात उतरली असून बंडखोरी केलेल्यांची पक्षातून हकालपट्टी झाली आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या विजयाची दिशादर्शक सभा असल्याचे सांगितले. या वेळी अल्पसंख्य समाजासह अनेक संस्थांच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

# फॉरेनचे पार्सल परत पाठवू -आमदार रविशेठ पाटील

### कोलाड, उडवणे विभागात महायुतीचा जोरदार प्रचार



**धाटाव : प्रतिनिधी**

विरोधकांच्या भूलथापांना मतदार बळी पडणार नाहीत. येथील जनताच येत्या २० तारखेला कमळ या चिन्हावर बटन दाबून मला विजयी करतील व फॉरेनचे पार्सल परत पाठवतील, अशी टीका महायुतीचे पेण विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांनी नाव न घेता शेकापचे उमेदवार म्हात्रे यांच्यावर केली.

पेण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे लोकप्रिय उमेदवार आमदार रवीशेठ पाटील यांनी सोमवार (दि. ११) प्रचाराचा शुभारंभ केला. कोलाड, उडदवणे, पिगळसई, मेढा विभागात आमदार रविशेठ पाटील व राष्ट्रवादीचे माजी आमदार अनिकेत तटकरे डोअर टू डोअर यांनी प्रचार केला व मतदारांचे आशीर्वाद घेतले.

या वेळी माजी आमदार अनिकरे यांनी, महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांनी या मतदारसंघात कोट्यावधींची विकासकामे केली आहेत, तसेच या विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसची संपूर्ण ताकदही रविशेठ पाटील यांच्या पाठिशी आहे. महायुतीचे पदाधिकारी व राष्ट्रवादीचे काँग्रेसचे सर्व नेते एकदिलाने काम करीत असल्यामुळे मला विश्वास आहे की, रविशेठ पाटील यांना या विभागातून जास्तीत जास्त मताधिक्य देऊन विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी महायुतीचे भाजप जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, तालुकाध्यक्ष अमित घाग, अनंता देशमुख, घनश्याम कराळे, ललीत पाटील, यज्ञेश भांड, प्रितम पाटील, राम सावंत, संजय लोटणकर, राकेश शिंदे, संजय माडलुसकर, सुरेश महाबळे, रवींद्र तारु शेट, सोपान मोहिते, महेश ठाकूर यांसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माधवबाग येथे आरोग्य शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

माधवबाग खोपोली येथे आरोग्य तपासणीसाठी लायन्स क्लब अलिबाग पोयनाड यांच्या सौजन्याने नुकतेच आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात लायन्स क्लबकडून २५ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

निसर्गरम्य व हिरवळीने दाटलेल्या परिसरात माधवबाग हे प्रसिद्ध रुग्णालय आहे. याच माधवबाग हॉस्पिटलमध्ये हृदयाची व मधुमेह रुग्णांची शारीरिक तपासणी करण्यात आली, तसेच येथील सहकारी तुषार पाटील यांनी उत्तम मार्गदर्शन केले. लायन्स क्लब पोयनाड यांचे सचिव सुनील काकडे, निलम माळी व खजिनदार रत्नकांत सुर्यवंशी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. निरोगी व सदृढ आरोग्यासाठी सदर शिबिर दर महिन्याला घेण्यात येईल, असे सांगण्यात आले.



## जातीवादाचे राजकारण करू नका -गोपीनाथ जाधव

**चौक : प्रतिनिधी**

जातीपातीचे राजकारण करू नका, ते समाजाला योग्य दिशा देणारे नाही. आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकासकामांवर आमने सामने चर्चा करा. आम्हीही मराठा समाजासाठी कार्यरत असून आमदार महेश बालदी यांनी केलेली विकासकामे ही जनतेच्या हितासाठी आहेत. खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे हे स्वतः मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्यासाठी कार्यरत राहिले आहेत, असे मराठा समन्वयक आणि माजगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच गोपीनाथ जाधव यांनी सांगितले.



उरण मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महेश बालदी यांची सभा मोहपाडा रसायनी येथे आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी, जे विरोधक सतत आमदार महेश बालदी यांचा उल्लेख मारवाडी, परप्रांतीय करतात, त्यांच्यावर टीका केल्याची क्लिप सोशल मीडियाच्या माध्यमातून फिरत होती. याबाबत माजी सरपंच गोपीनाथ जाधव बोलत होते. ते पुढे म्हणाले, प्रवीण मोरे २५ वर्षे सेनेचे काम करीत होते, पण त्या वेळच्या लोकप्रतिनिधींना आदिवासी विकास करता आला नाही. तो विकास आमदार महेश बालदी यांनी केला आहे. माझ्या ग्रामपंचायतीचा पाण्याचा प्रश्नदेखील त्यांनी सोडविला. भाजपचे चौक अध्यक्ष गणेश कदम यांनी सांगितले, माथेरानच्या बरोबरीत असलेली हाशाची पट्टी, गारभाट, इर्शाळवाडी या दुर्गम भागात जाणारे आमदार महेश बालदी हे पहिले आमदार आहेत. विरोधकांना मुद्दा नसल्याने ते जातीचे राजकारण करीत आहेत, प्रवीण मोरे यांच्या बोलण्याचा वेगळा अर्थ काढून राजकारण करू नये, असे आवाहन केले. भिलवले बूथप्रमुख सचीन ठोंबरे, भाजपचे कार्यकर्ते मनोज पारठे यांनीही आपली मते मांडली.

**हरवले आहे**

मी आशा साहेबराव कदम सूचित करते की, माझा यशवंत महाविद्यालय, नांदेड. इयत्ता 12 वीं सायन्स चा दि. 10/06/1994 रोजीचा शाळा सोडल्याचा दाखला रजि. नं 5691/2009 हरविला आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करा.

**7666788799**

## अलिबागमधील मतदान केंद्रांची निवडणूक निरीक्षकांनी केली पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक रुही खान यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातील शेंडसई, महाळुंगे, भातसई, डोंगरी, चणेरा, आरे बुद्रुक, न्हावे, खैराले, खैरे खुर्द, खुटाळ मतदान केंद्राना भेटी देत पाहणी केली. मतदान केंद्रात असणाऱ्या त्रुटीबाबत सूचनादेखील केल्या. खान यांनी आतापर्यंत १०६ मतदार केंद्राना भेटी देऊन पाहणी केली आहे. या वेळी त्यांचे संपर्क अधिकारी उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके उपस्थित होते.



मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्रावर सुरळीत प्रवेश, मार्गदर्शक सूचना, दिशादर्शक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती याबाबत त्यांनी माहिती घेतली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

## माणगावमध्ये उद्या नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव** : माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि.१३) एचडीएफसी बँकेच्या समोर, पेपर विक्रेते नितीन मेथा यांच्या जवळील महेंद्र मेथा यांचे सभागृहात करण्यात आले आहे.

शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी, तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास ती देखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे.शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते को, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही न्यांचे विद्यमान मालक **निलेश नंदलाळ गावंड व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे

**मिळकतीचे वर्णन मौजेः सारडे (५५३३४३)**
**(PU-ID १७६७७०२९५१३), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२३/३/ ब खाते क्रमांक ५३० | २ | ०.१६.२० पो.ख. ०.००.०० | ३.६२ |
| | | एकुण ०.१६.२० | |

एकुण क्षेत्र ०.१६.२० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/११/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
पत्ता :- बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **निलेश नंदलाळ गावंड व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे

**मिळकतीचे वर्णन : मौजेः सारडे (५५३३४३)**
**(PU-ID ३१७०७६९४६९८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२४/८ खाते क्रमांक ५३० | २ | ०.१६.८० पो.ख. ०.०१.०० | ३.९४ |
| | | एकुण ०.१७.८० | |

एकुण क्षेत्र ०.१७.८० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/११/२०२४

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**
पत्ता :- बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड - ४१०२०६ मो. क्र. ९९२०४७५८०१

# रायगडात पनवेल मतदारसंघामध्ये पुरुष मतदारांची संख्या जास्त

**खारघर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील एकूण सात मतदारसंघातली सर्वांत मोठ्या असलेल्या पनवेल मतदारसंघाची आणखी एक नवीन विशेषतः आहे. ती म्हणजे जिल्ह्यातील उर्वरित सहा मतदारसंघाच्या एकूण मतदारांपैकी पनवेलच्या पुरुष मतदारांची संख्या सर्वाधिक आहे.

रायगड जिल्ह्यात पनवेल, उरण, कर्जत, पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड या सात मतदार संघाचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यासह कोकणाचे प्रवेशद्वार म्हणुन पनवेलची ओळख आहे. विविध प्रकल्पामुळे पनवेलचे नाव देशपातळीवर पोहचले असल्याने साहजिकच




त्याठिकाणची लोकसंख्यादेखील झपाट्याने वाढत आहे. कॉस्मोपॉलिटिन मतदार याठिकाणी वास्तव्याला आलेला असल्याने पनवेल आज पिंपरी चिंचवडपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाचा मतदारसंघ आहे, मात्र पनवेलची पुरुष मतदार संख्याची उर्वरित सहा मतदारसंघाच्या तुलनेत सर्वात जास्त असल्याने पुरुष मतदारांचा एक मतदार पनवेलमध्ये तयार होऊ शकतो. पनवेलच्या सहा लाख ५२ हजार ६२ मतदारांपैकी पुरुष मतदारांची संख्या तीन लाख ४६ हजार ४०२ एवढी आहे.

या मतदारांशी तुलना केल्यास त्या खालोखाल उरण मतदारसंघाच्या मतदारांची एकूण संख्या तीन लाख ४२ हजार १०१ एवढी आहे. जिल्ह्यात सर्वात लहान मतदार संघ श्रीवर्धन मतदारसंघ आहे. या मतदारसंघाची मतदार संख्या दोन लाख ६५ हजार २८६ एवढी आहे.

रायगड जिल्ह्यात झपाट्याने शहरीकरण होत असल्याने या ठिकाणी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. २०२९ साली रायगड जिल्ह्यात आणखी दोन विधानसभा मतदारसंघ वाढण्याची शक्यता आहे.

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ, विरार अलिबाग कॉरिडॉरमुळे येथील दळणवळण व्यवस्थेचा परिणाम विविध उद्योग धंदे, व्यवसाय, मालवाहतूक तसेच प्रकल्पांवर होणार असल्याने पुढील काळात पनवेलसह रायगड जिल्हा महाराष्ट्रासह देशाच्या नकाशावर अधोरेखित झालेला दिसणार आहे.

# आदिवासी आणि चर्मकार समाजाचा आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समस्त आदिवासी समाज आणि चर्मकार समाज बांधवांच्या भव्य मेळाव्यात त्यांनी पनवेलच्या विकसाचे सुत्रधार आमदार प्रशांत ठाकूर यांना आपला जाहीर पाठींबा रविवारी दिला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी समाजबांधवांच्या पाठीशी मी सदैव उभा राहणार असून संत रोहीदास मंदिर आणि आदिवासी भगिनींना कायमस्वरूप व्यवसाय करण्याची व्यवस्था करण्याची कामे येत्या काळात पूर्ण करणार असल्याची ग्वाही दिली.



पनवेल विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना विविध संघटना, संस्था तसेच समजा बांधवाचा पाठिंबा मिळत आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा देण्यासाठी खारघर सेक्टर १९ मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये समस्त आदिवासी समाज आणि चर्मकार समाज बांधवांचा भव्य मेळावा रविवारी संपन्न झाला. संघटनेचे अध्यक्ष जगदीश ठकूर यांच्या पुढाकाराने हा मेळावा झाला. या मेळाव्यात



समाज बांधवानी आपला जाहीर पाठिंबा आमदार प्रशांत ठाकूर यांना जाहिर केला.

या वेळी दलित पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहे पडवळ, शिवसनेचे पनवेल जिल्हा अध्यक्ष रामदास शेवाळे, पनवेल गटई कामगार युनियनचे अध्यक्ष शिवदास कांळे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रविण पाटील, शिवसेना खारघर शहर प्रमुख प्रसाद पर, आरपीआयचे तालुका अध्यक्ष विजय पवार, संत शिरोमणी सामाजिक संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काकडे, अध्यक्ष जगदिश ठाकूर, खारघर वेलफेर्अ असोसिएशनचे प्रेम ठाकूर, उपाध्य सुरेश उनवणे, सचिव राजेंद्रमुकार कारंडे, खजिनदार सखाराम ठोसर, धामोळे गाव कमिटी अध्यक्ष बाळाराम पारधी, खारघर भाजी मार्केट समन्वयक विद्या भगत, गौऱ्या गणपती ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद पावशे, संत शिरोमणी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भानुदास राजगुरु, शहर गटई कामगार युनियनचे अध्यक्ष राजेश परमेश्वर, समाजीक कार्यकर्ते केशव कातकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक अध्यक्ष मंगेश नेरुलकर, पनवेल शहर गटई कामगार युनियनचे तालुका अध्यक्ष राजकुमार डोयरीया, पांडुरंग वैष्णव आदी उपस्थित होते.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी कळंबोलीत प्रचार रॅली

## वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर यांची उपस्थिती

**कळंबोली : बातमीदार**

विधानसभेच्या रणधुमाळीत महायुतीचे पनवेल विधानसभा क्षेत्रातील दमदार उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी त्यांच्या पत्नी वर्षा ठाकूर व महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पत्नी अर्चना ठाकूर याही रणांगणामध्ये उतरल्या आहेत. त्यांच्या झंझावाती प्रचाराला कळंबोली वसाहतीसह अन्य भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

कळंबोलीतील गुरुविला सोसायटीमध्ये झालेल्या प्रचार रॅलीत नागरिकांनी त्यांचे फटाक्याच्या आतषबाजीत भव्य स्वागत करून पुन्हा एकच वादा फिरसे प्रशांतदादाचा नारा मतदारांनी दिला आहे.

विधानसभेच्या प्रचाराची रणधुमाळी आता शिगेला पोहचत आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांच्या



प्रचारासाठी आता वर्षा ठाकूर व अर्चना ठाकूर याही प्रचाराच्या रणधुमाळीमध्ये सहभागी झाल्या आहेत. वर्षा ठाकूर स्वतः प्रचाराची धुरा सांभाळत असून कळंबोलीतील विविध हौसिंग सोसायटीमधून प्रचार करून पुन्हा प्रशांत ठाकूर यांना शंभर टक्के मतदान करून आमदार करण्यासाठी आवाहन करत आहेत. सोमवारी सायंकाळी झालेल्या प्रचार रॅलीत मोठ्या संख्येने मतदारांनी सहभाग घेतला.

या वेळी त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रिया मुकादम, सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील, सचिव उमाकांत गव्हाणे तसेच सदस्य गहिनीनाथ धुमाळ, अशोक भोसले आदींसह सोसायटीतील सदस्य सहभागी झाले होते.

या वेळी वर्षा ठाकूर यांनी, मी निश्चितच सोसायटी व कळंबोली वसाहतीमधील नागरी प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून कळंबोलीच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# जुईनगरमध्ये मटण विक्रेत्याला मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

किरकोळ वादातून मटण विक्रेता व त्याच्या मुलाला जबर मारहाण झाल्याची घटना जुईनगरमध्ये घडली आहे. यामध्ये एकाची प्रकृती गंभीर असून जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी इस्टेट एजंटसह पाच जणांवर नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

जुईनगर सेक्टर २४ येथे शुक्रवारी रात्री हा प्रकार घडला आहे. परिसरात मटण विक्री करणाऱ्या अकील कुरेशी यांच्या मुलाचा परिसरातच राहणाऱ्या एका व्यक्तीसोबत किरकोळ वाद झाला होता. पाळलेला बकरा परिसरात फिरत असल्यावरून वाद झाला होता, असे समजते, मात्र या वादात स्थानिक स्वयंघोषित दादाने वेगळे वळण देत स्थानिकांची माथी भडकवण्याचा प्रयत्न केल्याचे समजते.

या हल्ल्यात एक जण जखमी असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. दरम्यान, या प्रकरणाचा नेरूळ पोलीस तपास करत आहेत.

पाच ते सहा जणांच्या जमावाने मटण विक्रेते कुरेशी यांना व्यवसाय बंद करण्याची धमकी दिली. यातून त्यांच्यात वाद झाला असता कुरेशी व त्यांची दोन मुले सुलतान व अतिक यांना जबर मारहाण केली. याप्रकरणी शनिवारी दुपारी विजय साळे, माधव सुतार व इतर तिघांवर नेरूळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# पेट्रोल पंप बिलाच्या रकमेचा अपहार

**पनवेल : वार्ताहर**

पेट्रोल पंपावर मॅनेजर आणि कॅशियर म्हणून काम करणाऱ्या राहुल कुमार संतु यादव याने तीन लाख ६६ हजार १३२ रुपये पेट्रोल पंपाच्या मालकाला न देता त्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे

वेलकम हॉटेलच्या बाजूला पळस्पे येथे एजी जाजल पेट्रोल पंप आहे. २०१२ पासून राहुल कुमार यादव हा डिझेल भरण्याचे काम करत होता. २०१९ पासून त्याला असिस्टंट मॅनेजर व कॅशियर म्हणून कामासाठी ठेवले. ऑगस्ट महिन्यात पंकज कुमार पांडे- मॅनेजर हे गावी गेले. या वेळी त्यांचा कारभार राहुल कुमार यांच्याकडे सोपवला. ते पुन्हा कामावर रुजू झाले. या वेळी त्यांचे खातेधारक ग्राहक यांच्याकडे डिझेलच्या बिलाचे पैसे मागितले असता राहुल यादव यांच्याकडे रोख रक्कम दिल्याचे सांगितले. यावेळी त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर दुसऱ्या खातेधारकाला

बिलाची मागणी केली असता त्याने राहुल कुमार यादव याला पैसे दिल्याचे सांगितले. अशाप्रकारे एकूण तीन लाख ६६ हजार १३२ रुपये रोख रकमेबाबत राहुलकडे विचारणा केली असता त्याने रक्कम स्वीकारल्याचे कबूल केले. आणि पैसे मुलाच्या दवाखान्यासाठी खर्च केल्याचे सांगितले. त्यानंतर त्याने पैसे परत देतो असे सांगितले, मात्र पैसे परत दिले नाहीत. त्याला फोन केला असता फोन बंद आला. या प्रकरणी राहुल कुमार संतु यादव (राहणार नांदगाव पनवेल, मुळगाव उत्तर प्रदेश याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयासाठी शिवसेनाप्रणित संघटना सरसावल्या!

**पनवेल : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांना विजयी करण्यासाठी शिवसेना प्रणित शिवप्रेरणा श्रमिक कामगार संघटना आणि चालक मालक संघटना प्रयत्नांची पराकष्टा करणार असल्याचे प्रतिपादन नुकत्याच शिवसेना पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत त्यांनी केले आहे.

पनवेल विधानसभा महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर हे चौथ्यांदा ही निवडणूक लढवित असून त्यांच्या साथीला शिवसेना हा पक्ष पूर्ण ताकदीनिशी उतरला आहे. पनवेल शहराचा विकास करण्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांचे योगदान महत्त्वाचे आहे. पारदर्शक कारभार आणि विकासावर ठाम या सुत्रामुळे प्रशांत ठाकूर यांनी आपल्या



कारकिर्दीमध्ये मोठ्या प्रमाणात विकासाची कामे केली असून त्यांच्या या विकासकामामुळे पनवेलचे रुप पालटत चालले आहे.

सलग चौथ्यांदा ते निवडणूक लढवित असून याही वेळी सुद्धा ते भरघोस मतांनी विजयी होतील यात तिळमात्र शंका नसून त्यांच्या साथीला आता शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आरपीआय (अ) ही महायुती हातात हात घालून प्रचारात उतरली असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याची माहिती या वेळी उपमहानगरप्रमुख महेश सावंत यांनी दिली आहे.

# माजी विद्यार्थीही आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मुरूड येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील माजी विद्यार्थी संघटनेतील कामोठ्यात राहणाऱ्या सदस्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्याचे पत्र त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द केले.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह संघटनेतील बाळसाहेब सपकाळ, मारुती जाधव, पंढरीनाथ घाडगे, हरिभाऊ घाडगे, ॲड. हेमंत घाडगे, दीपक



मोरे आदी उपस्थित होते.

न्यू इंग्लिश स्कूल मुरूड (ता. पाटण, जि.सातारा) माजी विद्यार्थी संघटना कामोठे आणि पनवेल विधानसभा मतदार संघात राहणारे आमची साधारण एकूण ५०० कुटुंबे आमच्या विभागातील इतर सर्व रहिवाशी आणि आमच्या मित्रपरिवाराच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर साहेबांना जाहीर पाठिंबा देत आहोत आणि बहुमताने निवडून येण्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

आपण आमच्या शाळेसाठी केलेली मदत बहुमूल्य आहे आणि रयत शिक्षण संस्थेसोबत असलेले आपले ऋणानुबंध आणि आमच्या शाळेवर आपले प्रेम आणि आशीर्वाद असाच कायम असावा. आपल्या कुटुंबाच्या माध्यमातून या पनवेल विधानसभेचा आणि इथल्या सर्वसामान्य नागरिकांचा असाच चांगला विकास होत राहावा ही सदिच्छा, या पाठिंबा पत्रामध्ये व्यक्त करण्यात आली आहे.

# उरणमध्ये धूलिकण वाढल्याने हवेचे प्रदूषण

## आर्द्रतेमुळे नागरिकांना सर्दी, खोकल्यासह श्वसनाचा त्रास

**उरण : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून उरणच्या हवेची गुणवत्ता खालावू लागली असून गुरुवारी दुपारी हवा गुणवत्ता निर्देशांक ३०० पार गेल्याने प्रदूषणात उरण शहर देशात तिसऱ्या क्रमांकाचे शहर गणले गेले, परंतु धूलिकणवाढ मानवी शरीरास घातक नसल्याचा दावा विभागीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे.

उरणच्या हवेचा निर्देशांक ३१८वर पोहचला होता. गेल्या अनेक वर्षांपासून उरणच्या प्रदूषित हवेच्या मात्रेत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांना सर्दी-खोकला आणि श्वसनाचाही त्रास होऊ लागला आहे. सध्या आर्द्रता वाढत असल्याने सकाळी प्रदूषके साचून राहतात.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार हवा



गुणवत्ता निर्देशांकातील ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० अत्यंत वाईट आणि ४००पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते.

उरण परिसरात सध्या सकाळी धुके पडत आहे. कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहत आहे, तर किमान तापमान २० ते २७ अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. पावसाळ्यानंतर वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. बाष्पामुळे धूलिकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणांबरोबरच अनेक मानवनिर्मित कारणेही प्रदूषणात भर घालत आहेत.

पावसाळ्यात येथील राष्ट्रीय महामार्गावर आलेल्या मातीची धूळ झाली आहे. या मार्गावरून दररोज हजारो जड वाहने ये-जा करीत असल्याने त्याचप्रमाणे शेतीच्या मळणीला सुरुवात झाल्याने उरण परिसरात धूलिकणांत वाढ झाली असल्याने हवा गुणवत्ता खालावली आहे, मात्र ही हवा हानीकारक नाही. उरणमध्ये हवा गुणवत्ता मोजण्यासाठी व्यवस्था आहे, असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विक्रांत भालेराव यांनी सांगितले.

### आजारांबाबत अशी घ्या काळजी

प्रदूषणामुळे श्वसन आणि त्वचेशी संबंधित आजार उद्भवतात. सकाळी आणि सायंकाळी धुरक्याचे प्रमाण जास्त असते. अशा वेळी घराबाहेर पडणे टाळावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. थंड पेये, तेलकट पदार्थ वर्ज्य करावेत. लहान मुले, वयोवृद्ध यांच्यासाठी हे वातावरण धोकादायक असल्याने त्यांनी विशेष काळजी घ्यावी.

### हवा होतेय खराब!

अवजड वाहनांची वाढती संख्या तसेच व्यावसायिक संकुले, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवण्यात येत आहे. वाहनांच्या धुरामध्ये अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. हे कण प्रदूषण वाढविण्यास कारणीभूत ठरतात.





**खारघर : सेक्टर २० येथील केशन गार्डन सोसायटीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोसायटी पदाधिकारी व सदस्यांसोबत बैठक घेतली. या वेळी सोसायटीसह परिसरातील समस्या जाणून घेत त्या सोडविण्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोसायटीच्या प्रतिनिधींना दिले. या बैठकीवेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, मंडल सचिव शोभा मित्रा, सोसायटी सचिव रमेश नायक, दिलीप नायर आदी उपस्थित होते.**

# रायगडात ओल्या मासळीचे उत्पादन घटले

## ◆ मांसाहारी खवय्यांना आता सुक्या मासळीचा आधार; मात्र भाव वधारलेले

**रायगड : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही महिन्यांपासून समुद्रात सातत्याने येणारी वादळे, प्रदूषण यामुळे ओल्या मासळीचे प्रमाण घटले आहे. त्यामुळे सध्या अनेक खवय्ये सुक्या मासळीवर ताव मारत आहेत. असे असले तरी सध्या सुक्या मासळीचे भाव अद्यापही वाढलेले असल्याने सामान्यांना घाम फुटला आहे.

पावसाळ्यापासून सुक्या मासळीचे भाव वधारलेले आहेत. ऑक्टोबर महिन्यात भाव उतरतील अशी अपेक्षा होती, मात्र परतीचा पाऊस लांबल्याने सुक्या मासळीचे भाव अजूनही खाली उतरलेले नाहीत. पावसाळ्याच्या दिवसात अनेकांनी सुकी मासळी साठवण करून ठेवली होती. आता पावसाळा सरला असून साठवण केलेली मासळीदेखील संपली आहे.



सध्या समुद्रात मासे मिळत आहेत, मात्र परतीचा पाऊस लांबल्याने ऑक्टोबर महिन्यात मासळी सुकविण्यास पोषक वातावरण नव्हते. परिणामी सुक्या मासळीची कमतरता अधिक आहे. सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल होत आहेत. त्यांना येथील समुद्रातील ताज्या मासळीबरोबरच सुक्या मासळीचेदेखील आकर्षण आहे. पर्यटक सुकी मासळी स्वस्त भावामध्ये खरेदी करून नेतात. जिल्ह्यासह पुणे-मुंबई या शहरातील पर्यटक व नागरिक आवर्जून येथून खरेदी करून घेऊन जातात, तर काहीजण भेट म्हणूनदेखील देतात, मात्र सुक्या मासळीचे वधारलेले भाव आणि कमी प्रमाणात उपलब्ध असलेली सुकी मासळी यामुळे येथील पर्यटकांचा हिरमोड होत आहे. जिल्ह्यातील आठवडा बाजार व मासळी बाजारात सुकी मासळी खरेदीसाठी रेलचेल असते. आठवडे बाजारामध्ये साधारणतः सुकी मासळी स्वस्त मिळते, मात्र सध्या आठवडा बाजारामध्येही सुकी मासळी महाग मिळत आहे.

### सुक्या मासळीचे भाव प्रतिकिलो

*१) साधे सोडे १२०० ते १५०० रुपये किलो*
*२) चांगल्या दर्जाचे सोडे १८०० ते २२०० रुपये किलो*
*३) बांगडा २० ते २५ रुपये १ नग*
*४) अंबाड ४०० ते ५०० रुपये किलो*
*५) सुका जवळा दर्जानुसार ३५० ते ४०० रुपये किलो*
*६) मोठे बोंबील चांगल्या दर्जाचे ५०० ते ६०० रुपये किलो*
*७) छोटे बोंबील ५०० रुपये किलो*
*८) साधी सुकट २०० ते २५० रुपये किलो*

## निवडक

### आवास येथे नागेश्वराची यात्रा



**अलिबाग :** तालुक्यातील आवास येथे प्रसिद्ध जागृत श्री नागोबा देवस्थानच्या भव्य यात्रेचे गुरुवारी (दि.१४) आयोजन करण्यात आले आहे. या देवस्थानाला रायगड जिल्ह्यातून भाविक आवर्जून दर्शनासाठी येतात. शेकडो वर्षांची परंपरा म्हणजे शेतकरी मोठ्या संख्येने बैलगाडी घेऊन आवर्जून येतात, तसेच या भव्य यात्रेत विविध प्रकारची दुकाने थाटली जातात. यावर्षीसुद्धा मोठ्या संख्येने भाविकांनी दर्शनासाठी यावे, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रुप ग्रामपंचायत आवास यांच्या वतीने सर्वांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था व आरोग्य यंत्रणेमार्फत आरोग्य सुविधा भाविकांसाठी राबवल्या जातात.

### वाघोली येथील तरुण बेपत्ता



**श्रीगाव :** अलिबाग तालुक्यातील वाघोली येथील अमित वाघपंजे (वय ३३) हा ३१ ऑक्टोबरपासून बेपत्ता असल्याची तक्रार पोयनाड पोलीस स्टेशनला करण्यात आली आहे. अमित वाघपंजे ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता घरातून बाहेर पडला तो आलाच नाही. त्याच्या कुटुंबीयांनी त्याची सर्वत्र शोधशोध केली मात्र तो सापडला नाही. त्याची उंची पाच फूट ११ इंच, सडपातळ शरीराबांधा आहे. घरून निघाला तेव्हा निळ्या रंगाची जीन्स पँट, हिरवा शर्ट घालून बजाज डिस्कवर लाल रंगाची बाईक (एमएच ०६-४९३८) ही गाडी घेऊन गेला आहे. याबाबत कोणाला माहिती मिळाल्यास (७६२०१४९८७९,९८५०५२२०८३) या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### ग्रामीण भागात शेकापचा प्रचार

**अलिबाग :** तालुक्यातील बेलोशी, घोटवडे, खानाव, बामणगाव आदी गावांमध्ये रविवारी (दि.१०) सायंकाळी शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराला सुरुवात झाली. त्यांनी गावातील मंदिरात जाऊन दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यानंतर घोटवडे, खानाव, बामणगाव आदी गावांमध्ये जाऊन कार्यकर्त्यांची भेट घेतली. शेकापचे तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्यासह बेलोशी, घोटवडे, खानाव, बामणगावमधील कार्यकर्ते, महिला तरुण वर्ग उपस्थित होते.



# माथेरान मिनीट्रेनचे इंजिन रुळावरून घसरले

### प्रवाशांची तारांबळ

**माथेरान : प्रतिनिधी**

नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनचा प्रवास शनिवारी अडखळत झाला. माथेरान येथून पर्यटकांना घेऊन निघालेल्या दोन्ही मिनीट्रेनची इंजिने मिनीट्रेन माथेरानवरून नेरळ येथे येताना रुळावरून खाली उतरले. त्यामुळे पर्यटकांनी भरलेल्या मिनीट्रेनमधील प्रवाशांना अंधारात मिनीट्रेन ट्रॅकने टॅक्सी पकडण्यासाठी यावे लागले.

नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक ६ नोव्हेंबर रोजी सुरू झाली आहे. माथेरान स्थानकातून शनिवारी दुपारी २.४५ वा. गाडी नेरळकडे जाण्यासाठी निघाली. गाडीमधून १११ पर्यटक प्रवासी





प्रवास करीत होते. नेरळकडे जात असताना गाडीचे इंजिन हे रुळावरून खाली उतरले. त्या वेळी इंजिनच्या मागे चार प्रवासी डबे आणि एक मालवाहू डबा लावला होता. गाडी साधारण ३.३० वा. १५५ या ठिकाणी थांबली आणि त्यानंतर तब्बल तीन तासांनी पुन्हा सुरू झाली. शनिवार असल्याने प्रवाशांचा खोळंबा होऊ नये, यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना त्यांच्या तिकिटाचे पैसे परत केले. नंतर पर्यटकांना चालत नेरळ-माथेरान घाटरस्त्यावर चालत यावे लागले. सर्व पर्यटक अंधार पडू लागल्यानंतर नॅरोगेज मार्गाने चालत लहान मुलांना घेऊन येत असल्याचे चित्र येथे होते. शेवटी ती गाडी नेरळ स्थानकात ८.३० वा. पोहचली.

माथेरान स्थानकातून दुपारी ४ वा. निघालेली मिनीट्रेनदेखील पर्यटकांनी भरली होती. या गाडीमधील सर्व चार प्रवासी डबे फुल्ल झाले होते. नेहमीप्रमाणे वेळेवर निघालेली मिनीट्रेन माथेरान स्थानकातून निघाली आणि १० मिनिटांनी अमन लॉज स्थानकातून नेरळकडे येण्यास निघाली. या मिनीट्रेनचे इंजिनदेखील अमन लॉजपासून काही मीटर अंतरावर पुढे जाऊन रुळावरून खाली उतरले. नंतर ही मिनीट्रेन ६ वा. नेरळ स्थानकात येण्याऐवजी रात्री ९.४५ वा. नेरळ स्थानकात पोहचली. त्या गाडीमधून प्रवास करणारे पर्यटक हे त्या गाडीमधून ताटकळत बसून प्रवास करीत होते.

मागील चार, पाच महिन्यांपासून या रेल्वेमार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने कामे सुरू होती, मात्र तरीदेखील इंजिनचे चाक रुळावरून खाली घसरले याबाबत नागरिक रेल्वे प्रशासनाच्या कामाबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित करीत आहेत.

# माणगावजवळ भरधाव कारच्या धडकेने पादचाऱ्याचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावजवळील कशेणे गावच्या हद्दीत भरधाव वेगाने आलेल्या कारच्या धडकेत पादचारी इसमाचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.१०) रात्री ८:३० वा.च्या सुमारास घडला. या अपघाताच्या गुन्ह्याची फिर्याद चेतन तानाजी सावरटकर (वय ३४, रा.डोंबिवली पूर्व) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, चेतन तानाजी सावरटकर व राजेश नथुराम पिरदनकर (वय ४२, रा.कशेणे, माणगाव) हे दोघे शतपावली करण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाच्या कडेने चालत असताना, मुंबईकडून माणगावकडे जाणाऱ्या सफेद रंगाच्या कारवरील चालकाने भरधाव वेगात येत राजेश पिरदनकर यांना पाठीमागून धडक दिली. राजेश पिरदनकर यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर कारचालक पळून गेला.

या अपघाताच्या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक बेलदार हे करीत आहेत.

# नेरळमध्ये जलवाहिनी फुटल्याने पाणी भातशेतीत

### शेतकरी हवालदिल

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत तालुक्यातील जिते गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून नळपाणी योजनेची जलवाहिनी गेल्या १० दिवसांपासून फुटली आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या भातपिकाचे नुकसान झाले आहे. शेतात कापून ठेवलेले भात पाण्यामुळे भिजून कुजले आहे. नेरळ ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची दुरुस्तीची कामे केली जात नसल्याने येथील शेतकरी हवालदिल झाले आहेत.



नेरळ नळपाणी योजनेच्या जलवाहिन्या जिते गावाच्या हद्दीतून जात आहेत. नेरळ ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेची जलवाहिनी १० दिवसांपूर्वी फुटली आहे. नळपाणी योजनेमधून पाणी दररोज १८ उचलले जात असून, जलवाहिनी फुटल्याचा सर्वाधिक तडाखा जिते गावातील शेतकऱ्यांन बसला आहे. जलवाहिनीमधून अस्ताव्यस्त पाणी तेथील वेगवेगळ्या भागात पसरले असून, त्या पाण्याचा फटका जिते गावातील सात शेतकऱ्यांना बसला आहे. जिते गावातील सात शेतकाऱ्यांच्या शेतात पाणी साचून राहिले आहे. त्याचा परिणाम भाताचे पीक जमिनीपासून सडून जाऊ लागले आहे, तर कापून ठेवलेले भाताचे पीक हेदेखील पाण्यामुळे सुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याबद्दल स्थानिक शेतकऱ्यांनी जिते गावातील शेतकऱ्यांनी नेरळ ग्रामपंचायतीमध्ये जाऊन तक्रारी केल्या आहेत, मात्र, तरीदेखील नेरळ ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे येथील शेतकरी संतप्त झाले आहेत.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.१०) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३५५ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ९७ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# माणगावात राष्ट्रवादी काँग्रेसचा झंझावाती प्रचार

**माणगाव : प्रतिनिधी**

येत्या २० नोव्हेंबर रोजी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाची निवडणूक होत असून महायुतीच्या उमेदवार राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचा माणगाव नगरीत राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे झंझावाती प्रचार सुरू आहे. या निवडणुकीत लाडक्या बहिणी लाडक्या आदिती तटकरे यांना प्रचंड मतांनी विजयी करतील, असा विश्वास पक्षाचे नेते तथा माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष आनंद यादव यांनी व्यक्त केला.



ते पुढे म्हणाले की, श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात आजतागायत आमचे नेते खासदार सुनील तटकरे यांनी माणगाव शहराला विकास कामांबाबत नेहमीच झुकते माप दिले. २०१९मध्ये श्रीवर्धन मतदारसंघाची उमेदवारी प्रथमच त्यांची कन्या आदिती तटकरे यांना मिळाली. या निवडणुकीत आदिती तटकरे या ३९ हजार ६४१ मतांच्या फरकांनी निवडून आल्या होत्या. आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेऊन विकासकामांना त्यांनी प्राधान्य दिले. शिवाय जनतेशी सततचा संपर्क त्यांनी ठेवला. महायुतीच्या सरकारमध्ये एकमेव महिला मंत्री म्हणून आदिती तटकरे यांना काम करण्याची संधी मिळाली. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री म्हणून काम करताना त्यांनी महिला सक्षमीकरण नजरेसमोर ठेऊन यामध्ये विशेष पुढाकार घेत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. माणगावात आदिती तटकरे यांनी विविध विकासाची कामे मार्गी लावली. त्यांना सर्वत्र उत्स्फूर्त असा वाढता प्रतिसाद मिळत असून सलग दुसऱ्यांदा आदिती तटकरे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून विधानसभेवर निवडून पाठवतील असा विश्वास यादव यांनी व्यक्त केला.

या प्रचारफेरीत माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, पक्षाचे माजी शहराध्यक्ष महामूद धुंदवारे, नगरसेवक, नगरसेविका, कायकर्ते, उपस्थित झाले होते.

# राहुल गांधींचे भारत जोडो नव्हे; तर भारत तोडो अभियान

## ◆ केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा पलटवार

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रचाराने चांगलाच जोर धरला आहे. प्रचाराचा रणधुमाळीत वरीष्ठ नेतेही उतरले आहेत. खोपोलीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मैदानात रविवारी (दि.१०) महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांच्या प्रचारार्थ आरपीआयचे नेते व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची सभा झाली. या सभेत त्यांनी काँग्रेसवर टीका करीत, राहुल गांधी यांचे भारत जोडो नाही, तर भारत तोडो अभियान असल्याचे म्हटले.



या वेळी महायुतीचे उमेदवार आमदार महेंद्र थोरवे, शिवसेनेचे सर्व पदाधिकारी, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, युवक अध्यक्ष प्रमोद महाडिक, भाजप जिल्हा महिलाध्यक्ष अश्विनी पाटील, आरपीआयचे जिल्हा व कर्जत मतदारसंघातील सर्व नेते, शिवसेना नेते पदाधिकारी, महायुतीच्या घटक पक्षांचे नेते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ना. रामदास आठवले यांनी खास त्यांच्या मिश्किल शैलीत विरोधकांचा समाचार घेत, मतदारसंघ व राज्याच्या भक्कम विकासासाठी पुन्हा महेंद्र थोरवे यांना निवडून देण्याचे आवाहन खोपोलीतील मतदारांना केले. राहुल गांधी यांचे जोडो भारत अभियान नव्हे तर तोडो भारत अभियान असून जातीजातीत फूट करण्याचा त्यांचा इरादा केव्हाही सफल होणार नाही, असा इशारा दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात स्थिर सरकार व भक्कम विकास आणि सर्वांगीण प्रगती सुरू असल्याचे सांगितले. राज्यातही विकासाची गंगा प्रवाहित ठेवण्यासाठी महाराष्ट्रामध्ये पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी महेंद्र थोरवे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आपल्या भाषणात मिश्कील शैली व हास्यकविता सादर करून आठवले यांनी विरोधकांना चिमटे काढून खोपोलीची सभा गाजवली. उमेदवार महेंद्र थोरवे यांनी मागील अडीच-तीन वर्षांत कर्जत मतदारसंघातील विकास कामांचा आढावा घेत पुन्हा सेवा करण्यासाठी मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन केले.

ही सभा यशस्वी होण्यासाठी जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली शिवसेना, आरपीआय व भाजपच्या स्थानिक नेते व पदाधिकाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली होती. या वेळी आठवले यांच्या उपस्थितीत काही पक्षप्रवेशही करण्यात आले.





**तळा : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी स्विप कार्यक्रमांतर्गत मतदान करण्याबात जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थीदेखील उत्स्फूर्त सहभाग घेत आहेत. तळा तालुक्यात राजिप शाळेतील विद्यार्थिनींनी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती केली.**

# रोहित शर्मा पर्थ कसोटीला मुकणार?

## बॉर्डर-गावसकर ट्रॉफीपूर्वी भारताला झटका



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात आगामी पाच सामन्यांची बॉर्डर-गावसकर कसोटी मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये खेळवला जाणार आहे, पण याआधी भारताला मोठा धक्का देणारी बातमी समोर आली आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्मा पर्थ येथे होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यात तो खेळू शकणार नाही.

रोहित शर्मा आणि त्याची पत्नी रितिका सजदेह लवकरच दुसऱ्या मुलाचे पालक होणार आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याला रोहित शर्माची मुकण्याची शक्यता आहे. याशिवाय रोहित दुसरी कसोटी खेळणार की नाही याबाबतही संभ्रम आहे. जर तो ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये खेळू शकला नाही, तर टीम इंडियासाठी कोण सलामी देईल आणि नेतृत्व कोण करेल याबाबत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने काही प्रमाणात चित्र स्पष्ट केले आहे.

भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर पत्रकार परिषदेत म्हणाला, जर रोहित शर्मा उपलब्ध नसेल तर त्याच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराह भारतीय कसोटी संघाचे नेतृत्व करेल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर ट्रॉफीला २२ नोव्हेंबरपासून पर्थ येथे सुरुवात होणार आहे. भारताला ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर २२ नोव्हेंबर २०२४ ते ७ जानेवारी २०२५दरम्यान पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या दोन्ही संघांतील हे पाच कसोटी सामने अनुक्रमे पर्थ (२२-२६ नोव्हेंबर), ॲडलेड (६-१० डिसेंबर), ब्रिस्बेन (१४-१८ डिसेंबर), मेलबर्न (२६-३० डिसेंबर) आणि सिडनी (३-७ जानेवारी) येथे खेळवले जातील.

# दुसऱ्या टी-२० सामन्यात आफ्रिकेची बाजी

**गकेबेर्हा : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारतीय संघाला तीन विकेट्सनी पराभवाला सामोरे जावे लागले. यासह आफ्रिकन संघाने मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. प्रथम फलंदाजी करताना भारत केवळ १२४ धावाच करू शकला. यानंतर आफ्रिकेने हे लक्ष्य १९व्या षटकातच गाठले. फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती आणि रवी बिश्नोई यांनी पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु सूर्यकुमार यादवच्या एका निर्णयाने सामन्याची दिशाच बदलली.



फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या चमकदार कामगिरी केली. त्याने सामन्यात पाच विकेट्स घेतल्या आणि चार षटकांच्या कोट्यात केवळ १७ धावा दिल्या. याशिवाय रवी बिश्नोईनेही चार षटकांत २१ धावा देत एक विकेट घेतली. या दोन्ही खेळाडूंनी आफ्रिकन फलंदाजांवर अंकुश ठेवला आणि त्यांना मुक्तपणे फटकेबाजी करण्यापासून रोखले. एकेकाळी आफ्रिकेने ८६ धावांत सात विकेट गमावल्या होत्या आणि सामना जिंकण्यासाठी संघर्ष करत होता. अशा परिस्थितीत टीम इंडिया इथून सामना जिंकेल, अशी सर्वांना अपेक्षा होती. खेळपट्टीकडून फिरकीपटूंना भरपूर मदत मिळत होती आणि भारतीय फिरकीपटू वर्चस्व गाजवत होते.

यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने मोठा निर्णय घेतला आणि वेगवान गोलंदाजांकडून १७वी, १८वी आणि १९वी षटके टाकून घेतली आणि इथून सामन्याची दिशा बदलली. विशेष म्हणजे त्यावेळी फिरकी गोलंदाज अक्षर पटेलची तीन षटके बाकी होती. याआधीच्या सामन्यात अक्षरने फक्त एकच षटक टाकले होते आणि त्यात त्याने दोन धावा दिल्या होत्या. अशा परिस्थितीत सूर्याने फिरकीला अनुकूल असणाऱ्या खेळपट्टीवर अक्षरला फक्त एकच षटक टाकण्याची संधी दिली हा सर्वात मोठा प्रश्न आहे. ट्रिस्टन स्टब्सने ४१ चेंडूत सात चौकारांच्या मदतीने ४७ धावांची नाबाद खेळी साकारत यजमानांच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग महागडा ठरला आणि त्याने चार षटकांत ४१ धावा दिल्या, तर आवेश खानने तीन षटकात २३ धावा दिल्या. डेथ ओव्हर्समध्ये वेगवान गोलंदाजांसह गोलंदाजी करण्याचा सूर्याचा निर्णय टीम इंडियाला महागात पडला आणि भारताला पराभवाला सामोरे जावे लागले.

तत्पूर्वी पहिल्या सामन्यातील शतकवीर संजू सॅमसनला दुसऱ्या सामन्यात खातेही उघडता आले नाही आणि अभिषेक शर्माही स्वस्तात बाद झाल्याने भारतीय संघाला मोठा धक्का बसला. यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवही नऊ चेंडूत केवळ चार धावा करुन बाद झाला. टीम इंडियाकडून हार्दिक पांड्याने सर्वाधिक ३९ धावा केल्या, तर अक्षर पटेलने २७ धावांचे योगदान दिले. तिलक वर्माने २० धावा केल्या. हार्दिक शेवटपर्यंत विकेटवर टिकून राहिला आणि त्याच्यामुळेच टीम इंडियाला १२४ धावा करता आल्या.

# पाँटिंगचा भारतीय क्रिकेटशी काय संबंध?

## रोहित-विराटबद्दल केलेल्या वक्तव्यावर गंभीरने सुनावले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी भारतीय संघाची एक तुकडी ऑस्ट्रेलियाला रवाना झाली आहे. यादरम्यानच भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याने संघाबाबतच्या अनेक मुद्द्यांवर चर्चा केली आहे. त्याचबरोबर कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या फॉर्मबाबत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगच्या वक्तव्यावर त्याला सुनावले आहे.



आयसीसी रिव्ह्यू एपिसोडमध्ये बोलताना पाँटिंग म्हणाला होता की, मी नुकतीच विराटची आकडेवारी पाहिली. त्यात असे दिसले आहे की, गेल्या पाच वर्षांत त्याने फक्त दोन ते तीन कसोटी शतके झळकावली आहेत. ते मला योग्य वाटले नाही, पण जर ते खरे असेल, तर ही चिंतेची बाब आहे. पाच वर्षांत केवळ दोन कसोटी सामन्यात शतके झळकावणारा टॉप ऑर्डरमधील फलंदाज म्हणून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा कदाचित दुसरा कोणी नसेल.

पाँटिंगच्या वक्तव्याबाबत गौतम गंभीर म्हणाला, पाँटिंगचा भारतीय क्रिकेटशी काय संबंध? मला वाटते त्याने ऑस्ट्रेलियन क्रिकेटचा विचार करायला हवा आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्याला विराट आणि रोहितची चिंता नसावी. ते दोघेही एक उत्कृष्ट खेळाडू आहेत. भारतीय क्रिकेटसाठी त्यांनी खूप काही साध्य केले आहे आणि भविष्यातही ते कायम साध्य करत राहतील.

माझ्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोहित आणि विराट अजूनही खूप कठोर परिश्रम करतात आणि ते उत्कट आहेत, त्यांना खूप काही साध्य करायचे आहे आणि ते महत्त्वाचे आहे. गेल्या मालिकेत जे घडले त्यानंतर सर्वांमध्येच विजयाची आणि चांगल्या कामगिरीची भूक आहे, असेही गंभीरने नमूद केले.

### केएल राहुलची पाठराखण

केएल राहुलचा सध्या खूपच खराब फॉर्मामधून जात आहे, परंतु भारतीय संघाचा प्रशिक्षक गौतम गंभीरने राहुलची पाठराखण केली आहे. गंभीर म्हणाला, केएल राहुल टॉप ऑर्डरमध्ये फलंदाजी करू शकतो, तो तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकतो, सहाव्या क्रमांकावर खेळू शकतो. या सर्व गोष्टी पार पाडण्यासाठी खूप प्रतिभा असावी लागते आणि याचबरोबर तो एकदिवसीय सामन्यांमध्ये यष्टीरक्षणदेखील करू शकतो. किती देशांमध्ये केएलसारखे खेळाडू आहेत, याचा विचार करा. जर कर्णधार रोहित शर्मा पर्थमध्ये खेळल्या जाणाऱ्या कसोटीसाठी उपलब्ध नसेल तर राहुल त्याच्या जागी सलामीसाठी पर्याय आहे, असेही गंभीर म्हणाला.

# बटलरचा उत्तुंग षटकार; चेंडू गेला स्टेडियमच्या बाहेर

**ब्रिजटाउन : वृत्तसंस्था**

इंग्लंडच्या कर्णधार जोस बटलर याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेतून संघात पुनरागमन केले आहे. दुसऱ्या सामन्यात त्याने ४५ चेंडूत ८३ धावांची विस्फोटक खेळी साकारत इंग्लंडला सात विकेट्सनी विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. या दरम्यान त्याने एक असा उत्तुंग षटकार मारला, ज्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात जोस बटलरने ११५ मीटर लांब षटकार ठोकला. त्याचा हा षटकार क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात लांब षटकारांपैकी एक ठरला आहे. बटलरने नवव्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर विंडीजचा लेफ्ट आर्म स्पिनर गुडाकेश मोतीच्या षटकात समोरच्या दिशेला गगनचुंबी षटकार ठोकला. मारलेला चेंडू स्टेडियमच्या छतावर आदळल्यानंतर बाहेर गेला, ज्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# द. आफ्रिकेच्या मैदानात वरुण चक्रवर्तीचा 'पंजा'

## टी-२० क्रिकेटमध्ये पाच बळी टिपण्याची किमया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात पुन्हा एकदा वरुण चक्रवर्तीने आपल्या गोलंदाजीतील जलवा दाखवून दिला. डर्बनच्या मैदानता मॅचला टर्निंग पॉइंट देण्याची कामगिरी केल्यानंतर सलग दुसऱ्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात त्याने कमालीची गोलंदाजी करत टीम इंडियालाच्या विजयाच्या आशा पल्लवित केल्या. मिस्ट्री स्पिनरने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात चार षटकात १७ धावा खर्च करून पाच विकेट्स घेतल्या. ही त्याची आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.

वरुण चक्रवर्तीने सलामीवीर रीझा हेंड्रिक्स (२४), कर्णधार एडेन मार्करम (३), मार्को जेन्सन (७) आणि डेविड मिलर (०) आणि हेन्रिक क्लासेन (२) या खेळाडूंना तंबूचा रस्ता दाखवला. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च कामगिरी नोंदवताना त्याने खास क्लबमध्ये एन्ट्री मारली आहे. दक्षिण आफ्रिकेच्या मैदानात 'पंजा' मारणारा तो तिसरा गोलंदाज ठरला आहे.



चक्रवर्तीच्या आधी भुवनेश्वर कुमार याने २०१८मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या मैदानात पाच विकेट्स घेतल्याचे पहायला मिळाले होते. याशिवाय कुलदीप यादव याने २०२३मध्ये आफ्रिकेच्या मैदानात १७ धावा खर्च करून पाच विकेट्स अशी कामगिरी करून दाखवली होती. आफ्रिकेविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत चक्रवर्ती कुलदीपसह संयुक्तरित्या दुसऱ्या स्थानावर आहे. या यादीत पाकचा उमर गुल टॉपला आहे. आफ्रिकेविरुद्ध त्याच्या नावावर अवघ्या तीन धावा खर्च करून पाच विकेट्स मिळवल्याचा विक्रम आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीसंदर्भात आयसीसीचे अजूनही वेट ॲण्ड वॉच!

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) २०२५च्या चॅम्पियन्स ट्रॉफीशी संबंधित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. खासकरून भारतीय सामन्यांच्या नियोजनातील प्रमुख अडथळ्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्ड पुन्हा एकदा अडचणीत आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ११ नोव्हेंबरला लाहोरमध्ये आगामी स्पर्धेसंदर्भातील घोषणा करण्यात येईल, अशी चर्चा रंगली होती. यासाठी आयसीसीची एक टीम पाकिस्तानात दाखलही झाली होती, पण भारतीय संघाने पाकिस्तानात येऊन खेळण्यास नकार दिल्याचे वृत्त समोर येताच आता आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसंदर्भातील प्रस्तावित वेळापत्रक निरर्थक ठरल्याचा सीन निर्माण झाला आहे.



'क्रिकबझ'ने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार अद्याप आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीसंदर्भातील कार्यक्रमाची कोणतीही पुष्टी झालेली नाही. आयसीसी अजूनही यजमान आणि सहभागी क्रिकेट बोर्डांशी या स्पर्धेतील नियोजनासंदर्भात चर्चा करत आहोत. आयसीसी सदस्यांचा पाकिस्तान दौरा हा वेळापत्रक निश्चित करण्याच्या उद्देशाने नसून तो स्पर्धेच्या ब्रँडिंगचा एक भाग होता. लाहोरमधील परिस्थितीही बिकट असल्याचा उल्लेख संबंधित अधिकाऱ्याने केला आहे.

### हायब्रीड मॉडेलशिवाय पर्याय नाही

सध्याच्या परिस्थिती पाहता यजमानपद मिरवताना चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाक क्रिकेट बोर्डाला २०२३मधील आशिया चषक स्पर्धेप्रमाणे 'हायब्रीड मॉडेल'शिवाय अन्य पर्याय उरलेला नाही, असेच दिसते. सर्व गोष्टी स्पष्ट झाल्यावर या स्पर्धेच्या नियोजनासंदर्भातील माहिती आयसीसीकडून दिली जाईल.

आयसीसी संबंधित कार्यक्रमाची रुपरेषा अंतिम करण्यासाठी अधिक वेळ घेण्यामागच्या प्रमुख कारणामध्ये लाहोरमधील सध्याचे वातावरणही कारणीभूत असल्याचे समोर येत आहे. लाहोर शहर पाकिस्तानमधील दुसऱ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर आहे. या ठिकाणच्या स्थानिक प्रशासनाने प्राथमिक शाळांना आठवड्याभराची सुट्टीही दिल्याचे समजते.

एका बाजूला आयसीसीने प्रस्ताविक वेळापत्रक तयार करून भारतीय संघ पाकिस्तानात येऊन खेळेल यावर ठाम होता. दुसरीकडे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने पाकमध्ये खेळण्यास आपला नकार आयसीसीला आधीच कळवल्याची गोष्ट समोर आली होती. बीसीसीआयच्या भूमिकेनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी या संदर्भात आम्हाला कोणतीही माहिती मिळालेली नाही, असे म्हटले होते.






# विराट टाकू शकतो पाँटिंगला मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा दिग्गज फलंदाज विराट कोहली २२ नोव्हेंबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुरू होत असलेल्या पाच सामन्यांच्या बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेत आपल्या बॅटचा तडाखा दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या मालिकेत विराट हा महान क्रिकेटपटू रिकी पाँटिंगचा विक्रमही मोडू शकतो.

सध्या जागतिक क्रिकेटमधील महान फलंदाजांपैकी एक असलेला विराट कोहली ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेत ३५० धावा करून ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंगचा विक्रम मोडू शकतो. त्याने तसे केल्यास तो पाँटिंगला मागे टाकत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या क्रमांकावर येईल.

ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार पाँटिंगच्या नावे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २७,४८३ धावा आहेत, तर सध्या विराटच्या नावावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २७,१४३ धावा आहेत. विराट त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नसला, तरी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत धावा करू शकतो, कारण विराटची बॅट ऑस्ट्रेलियन खेळपट्ट्यांवर जबरदस्त धावा जमवते.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा बनवणाऱ्या फलंदाजांमध्ये पहिल्या स्थानी भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर (३४,३५७ धावा) आणि दुसऱ्या क्रमांकावर श्रीलंकेचा कुमार संगकारा (२८,०१६) आहे.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com